“मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना ” सुरु करणे व ती राबविण्याकरीता सोपी व सुलभ कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत एकत्रित नियमावली.

महाराष्ट्र शासन
महसूल विभाग

शासन निर्णय क्रमांक: लवेसू- २०२५/प्र.क्र.०२ (E-१४५२७१०)/पाणंद रस्ते.
पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक १८ नोव्हेंबर, २०२६.

वाचा :-

१. नियोजन विभाग, रोहयो प्रभाग, शा.नि.क्र. मग्रारो-२०२१/प्र.क्र.२९/रोहयो-१०अ,दिनांक ११.११.२०२१.
२ . महसूल व वन विभाग, शा.नि. क्र. लवेसू-२०२५/प्र.क्र.४५८/(E-१२५८६६७) / भूमापन (ल-१), दिनांक ०१.०८.२०२५.
३. महसूल व वन विभाग, शा.नि. क्र. लवेसू-२०२५/प्र.क्र. ४५८/(E-१२५८६६७) भूमापन (ल-१), दिनांक २१.०८.२०२५.
४. महसूल व वन विभाग, शा.नि. क्र.संकिर्ण-२०२५/प्र.क्र. ४५/ भूमापन (ल-१), दिनांक २६.०८.२०२५.
५. महसूल व वन विभाग, शा.नि. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ४५८/(E- १२५८६६७) भूमापन (ल-१), दिनांक २९.०८.२०२५.
६. महसूल व वन विभाग, शा.नि. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र.०२/(E- १४५२७१०) पाणंद रस्ते, दिनांक १४.१२.२०२५.
७. महसूल व वन विभाग, शा.नि. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/(E-१४५२७१०) पाणंद रस्ते, दिनांक ०७.०१.२०२६.
८. महसूल व वन विभाग, शा. शु. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/(E- १४५२७१०) पाणंद रस्ते, दिनांक १८.०२.२०२६.
९. महसूल व वन विभाग, शा.नि. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/(E-१४८९४९०)/पाणंद रस्ते, दिनांक २३/०२/२०२६.
१०. महसूल व वन विभाग, शा. शु. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/(E- १४५२७१०) पाणंद रस्ते, दिनांक २५.०३.२०२६.
११. महसूल व वन विभाग, शा. शु. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/(E- १६०५६५२) पाणंद रस्ते, दिनांक २५.०३.२०२६.
१२. महसूल व वन विभाग, शा. शु. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/(E-१६२२३९६)/पाणंद रस्ते, दिनांक १५.०४.२०२६.
१३. महसूल व वन विभाग, शा.नि.क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र.०२(E१६६२६५५)/पाणंद रस्ते, दिनांक २२.०६.२०२६.

१४. महसूल व वन विभाग, शा.नि.क्र. R&FD-८६०३२/३/२०२६-FAR -REV-REVENUE/ (E-१७५६३४२), दिनांक १५.०७.२०२६ .

१५. महसूल व वन विभाग, शा.शु.क्र. R&FD-८६०३२/३/२०२६-FAR -REV-REVENUE/ (E-१७५६३४२), दिनांक २४.०७.२०२६ .

१६. महसूल व वन विभाग, शा.नि.क्र. R&FD-८६०३०/५/२०२६-FAR-REV-REVENUE/ (E-१७६८६२७), दिनांक २४.०७.२०२६.

१७. महसूल व वन विभाग, शा.नि.क्र. R&FD-८६०३२/६/२०२६-FAR - REV-REVENUE / (E-१७६१०२६), दिनांक २४.०७.२०२६.

१८. महसूल व वन विभाग, शा.नि.क्र. R&FD-८६०३२/७/२०२६-FAR - REV-REVENUE (E-१७६३४९४), दिनांक २८.०७.२०२६.

१९. महसूल व वन विभाग, शा.नि.क्र. R&FD-८६०३२/८/२०२६-FAR - REV-REVENUE (E-१७९४१६८), दिनांक १३.०८.२०२६ .

२०. महसूल विभाग, शा.नि.क्र. R&FD-८६०३२/१२/२०२६-FAR-REV-REVENUE/(E-१८४६५४६) दिनांक ११.०९.२०२६ .

प्रस्तावना :-

राज्यातील ग्रामीण भागातील शेती क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी शेतामध्ये वेळेवर पेरणी, आंतरमशागत, पीक संरक्षण, कापणी, मळणी इत्यादी कामांसाठी तसेच तयार झालेला शेतीमाल बाजारपेठेपर्यंत विनाव्यत्यय पोहोचविण्यासाठी बारमाही शेत/पाणंद रस्ते असणे अत्यंत आवश्यक आहे. आधुनिक शेतीमध्ये वाढत्या यांत्रिकीकरणामुळे ट्रॅक्टर, हार्वेस्टर, थ्रेशर यांसारख्या अवजड यंत्रसामग्रीचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यामुळे शेतापर्यंत पोहोचण्यासाठी रुंद व भक्कम रस्त्यांची गरज निर्माण झाली आहे.

सध्या असे शेत/पाणंद रस्ते कोणत्याही प्रमुख सार्वजनिक रस्ते योजनेत थेट समाविष्ट नसल्यामुळे, त्यांची उपलब्धता व गुणवत्ता टिकवून ठेवणे आव्हानात्मक ठरते. अनेक ठिकाणी पारंपरिक शेतरस्त्यांवर अतिक्रमणे झालेली आहेत, रस्ते अरुंद झाले आहेत किंवा पावसाळ्यात चिखलामुळे ते पूर्णपणे निरुपयोगी होतात. या पार्श्वभूमीवर, शेत/पाणंद रस्ते अधिक प्रभावीपणे, जलद गतीने व दर्जेदारपणे निर्माण करण्यासाठी आणि अतिक्रमणे दूर करून रस्त्यांचे मजबुतीकरण करण्यासाठी एका सर्वसमावेशक योजनेची आवश्यकता होती.

मा. मंत्रिमंडळाच्या दि.०७.१२.२०२५ च्या बैठकीत दिलेल्या मान्यतेस अनुसरून राज्यातील ग्रामीण भागातील शेत/पाणंद रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी यंत्रसामग्रीच्या सहाय्याने जलद गतीने कामे करण्याकरिता **" मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना "** सुरू करण्यात आली असून, याबाबत शासन निर्णय दिनांक १४.१२.२०२५ अन्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. तदनंतर क्षेत्रीय स्तरावर प्राप्त झालेल्या सूचना, स्थानिक अडचणी आणि

अंमलबजावणीतील व्यावहारिक बाबी विचारात घेऊन वेळोवेळी विविध शासन निर्णय, शुद्धिपत्रके व शासनपत्रांद्वारे या मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा व दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत.

दिनांक १४.१२.२०२५ च्या मूळ शासन निर्णयातील व त्यानंतर निर्गमित झालेल्या सर्व अद्ययावत शुद्धिपत्रकांतील तरतुदींचे विषयनिहाय सविस्तर संकलन करून नव्याने एकत्रित सुधारित मार्गदर्शक नियमावली खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

१: योजनेचे स्वरूप, उद्दिष्टे व रस्ते नामकरण/क्रमांक पद्धती

१.१ योजनेची मान्यता व मुख्य स्वरूप

- ग्रामीण भागातील शेत/पाणंद रस्त्यांचे मजबुतीकरण व अतिक्रमणे मुक्त करण्यासाठी 'मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजने' सोबतच पूर्णपणे आधुनिक यंत्रसामुग्रीच्या सहाय्याने अत्यंत जलद गतीने कामे करण्यासाठी **" मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना "** ही स्वतंत्र योजना महसूल विभागामार्फत राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.
- या योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील शेतांपर्यंत जोडणारे सर्व पारंपरिक रस्ते, पाणंद रस्ते, गाडीमार्ग व पायमार्ग मोकळे करून त्यांचे मुरुमीकरण व मजबुतीकरण करणे हा आहे.

१.२ शेतरस्त्यांचे वर्गीकरण व विशिष्ट क्रमांक (Unique Identification Standard)

- ग्रामीण भागातील शेतरस्त्यांचे शिस्तबद्ध व्यवस्थापन करण्यासाठी खालील सर्व प्रकारच्या रस्त्यांचे सीमांकन (Demarcation) करून त्यांना विशिष्ट क्रमांक देणे अनिवार्य राहील:
  - अ) ग्रामीण रस्ते
  - ब) हद्दीचे ग्रामीण रस्ते
  - क) ग्रामीण गाडीमार्ग
  - ड) पायमार्ग
  - इ) शेतावर जाण्याचे पारंपरिक पायमार्ग व गाडीमार्ग
- वरील रस्त्यांचे सीमांकन करणे व त्यांना विशिष्ट क्रमांक देण्याकरिता शासन निर्णय दिनांक २९/०८/२०२५ व शुध्दीपत्रक दिनांक २५/०३/२०२६ अन्वये विहीत केलेल्या तांत्रिक व महसुली कार्यपद्धतीचा तंतोतंत वापर करावा.
- प्रत्येक रस्त्याला दिलेला क्रमांक संबंधित क्षेत्रातील गाव नकाशा, भूमी अभिलेख आणि संगणकीय प्रणालीवर नोंदवला जाईल.

२: प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी, निविदा, देयके व अंमलबजावणी यंत्रणा

२.१ कार्यान्वयीन यंत्रणा

"मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना" अंतर्गत रस्त्यांची कामे प्रत्यक्ष क्षेत्रावर राबविण्यासाठी खालीलपैकी कोणत्याही एका सक्षम यंत्रणेची नियुक्ती विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीद्वारे केली जाऊ शकते:

i) ग्रामपंचायत

ii) पंचायत समिती

iii) जिल्हा परिषद बांधकाम विभाग / उपविभाग

iv) प्रधानमंत्री ग्रामसडक योजना (PMGSY) / मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (CMGSY) विभाग

v) वन विभाग (रस्ता वनजमिनीतून किंवा वनहद्दीतून जात असल्यास)

vi) नागरी व लगतच्या क्षेत्रातील विकास प्राधिकरणे - जसे की NMRDA, MMRDA, PMRDA, CIDCO व इतर नागरी क्षेत्र प्राधिकरणे

vii) सार्वजनिक बांधकाम विभाग

कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून निश्चित करण्यात आलेल्या महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे (NMRDA, MMRDA, PMRDA इ.), CIDCO, नागरी क्षेत्रातील इतर प्राधिकरणे यांनी शेत/पाणंद रस्ते तयार करण्याचे निर्णय घेतल्यास सदर प्राधिकरणांनी या शासन निर्णयातील तरतुदींप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच त्याप्रमाणे कार्यवाही करताना संबंधित प्राधिकरणांनी जिल्हास्तरीय समितीने ठरविलेले दर वापरुन वेगळी निविदा प्रक्रिया करावी. सदर प्राधिकरणांनी करावयाच्या शेत/पाणंद रस्त्यांच्या यादीस विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीकडून मान्यता घ्यावी.

२.२ तांत्रिक मान्यता

कामांचे अंदाजपत्रक (Estimates) व तांत्रिक आराखडे मंजूर करण्याचे अधिकार खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहेत:

- **उपविभागीय अभियंता (Sub-Divisional Engineer):** रुपये २५.०० लाखांपर्यंतच्या कामांना तांत्रिक मान्यता देतील.
- **कार्यकारी अभियंता (Executive Engineer):** रुपये २५.०० लाखांपेक्षा जास्त मूल्याच्या कामांना तांत्रिक मान्यता देतील.
- ज्या ठिकाणी रस्ता वनजमिनीतून किंवा वनविभागाच्या हद्दीतून जात असेल, तेथे सर्व तांत्रिक मान्यता वन विभागाच्या सक्षम तांत्रिक अधिकाऱ्यांमार्फत दिल्या जातील.
- बळकटीकरण केलेल्या रस्त्याच्या गुणवत्तेसाठी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेचे उपअभियंता जबाबदार राहतील.

२.३ प्रशासकीय मान्यता

- प्रत्येक शेत/पाणंद रस्त्याच्या कामाकरिता स्वतंत्र प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार विधानसभा क्षेत्र समितीचे सदस्य सचिव तथा उपविभागीय अधिकारी (SDO) यांना प्रदान करण्यात आले आहेत.
- एकाच गावातील किंवा गटातील अनेक रस्त्यांचे एकत्रित प्रस्ताव आले तरी प्रशासकीय मान्यतेचा आदेश प्रत्येक रस्त्यासाठी स्वतंत्रपणे निर्गमित केला जाईल.

२.४ क्लस्टर रचना, कंत्राटदार पॅनेल व काम वाटप पद्धती

- **क्लस्टरची मर्यादा:** शेत/पाणंद रस्त्यांचे प्रशासकीय सुलभतेसाठी तयार करण्यात येणारे क्लस्टर (Cluster) जास्तीत जास्त **२५ किलोमीटर** लांबीचे असेल. मात्र, उपलब्ध निधी व स्थानिक भौगोलिक गरजेनुसार २५ कि.मी. पेक्षा कमी लांबीचे क्लस्टर तयार करण्यास पूर्ण मुभा राहील.
- **पॅनेल निवड पद्धती:** जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेली तांत्रिक अहर्ता व अंतिम केलेला प्रति तास दर आधारभूत मानून सदर तांत्रिक अर्हतेस पात्र ठरणाऱ्या इतर कंत्राटदारांची यादी विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीने तयार करावी. जिल्हास्तरीय समितीने जिल्हास्तरावर निविदा प्रक्रियेद्वारे अंतिम केलेल्या प्रति तास (L१ Rates) दरामध्ये काम करणाऱ्या जास्तीत जास्त कंत्राटदारांचे पॅनल विधानसभा क्षेत्र स्तरीय समितीने तयार करावे.
- **स्थानिक कंत्राटदारांना प्राधान्य :** विधानसभा क्षेत्रस्तरावर पात्र ठरलेल्या कंत्राटदारांच्या पॅनेलमधून कामाचे वाटप करताना, त्याच विधानसभा क्षेत्रातील पात्र स्थानिक कंत्राटदारांना प्राधान्य देण्यात यावे. संबंधित विधानसभा क्षेत्रातील स्थानिक कंत्राटदार काम करण्यास इच्छुक नसतील किंवा उपलब्ध नसतील, तर विधानसभा क्षेत्र स्तरीय पॅनेलमधील इतर कंत्राटदारांना काम वाटप करण्यात यावे.

२.५ देयके (Bills) प्रमाणीकरण व अदा करण्याची कार्यपद्धती

कामाच्या गुणवत्तेची खात्री करून कंत्राटदारांना देयके अदा करण्यासाठी खालील दोन टप्प्यांची वित्तीय कार्यपद्धती लागू राहील:

- **वितरण अधिकार:** तांत्रिक यंत्रणेने देयके प्रमाणित केल्यानंतर प्रत्यक्ष रक्कम अदा करण्याचे पूर्ण अधिकार विधानसभा क्षेत्र समितीचे सदस्य सचिव उपविभागीय अधिकारी (SDO) यांना असतील.
- **पहिला टप्पा (८०% देयक अदा करणे):** उपअभियंता (बांधकाम) यांनी कामाचे मोजमाप नोंदवून प्रमाणित केलेले प्रमाणपत्र आणि रस्त्याच्या दुतर्फा असणाऱ्या लगतच्या शेतकऱ्यांचे

समाधानकारक कामाबाबतचे स्वाक्षरीकृत प्रमाणपत्र जोडल्यानंतर देयकाची ८०% रक्कम अदा केली जाईल.

- **दुसरा टप्पा (उर्वरित २०% अंतिम देयक):** कामाची पूर्णता झाल्यानंतर, कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी करून दिलेले काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र (Completion Certificate) प्राप्त झाल्यानंतरच उर्वरित २०% रक्कम अदा करण्यात येईल.

३: वित्तीय तरतूद, निधीची उपलब्धता, लेखाशीर्ष व CSR निधी

३.१ अर्थसंकल्पीय तरतूद व समर्पित लेखाशीर्ष (Dedicated Budget Head)

"मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना" या नावाने पुढीलप्रमाणे स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यास संदर्भाधिन क्र.९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर लेखाशिर्षामध्ये शासनाकडून अर्थसंकल्पामध्ये स्वतंत्र निधीची तरतूद करून देण्यात येईल.

लेखाशीर्ष (इंग्रजी)	लेखाशीर्ष (मराठी)
Admin Dept : Revenue & Forest Department	प्रशासकीय विभाग : महसूल व वन विभाग
Demand No. : C-1	मागणी क्रमांक : सी-१
Major Head : 2515, Other Rural Development Programmes	प्रधान लेखाशीर्ष : २५१५, इतर ग्रामीण विकास कार्यक्रम
Sub Major Head : 00	उप प्रधान लेखाशीर्ष : ००
Minor Head : 101, Panchayati Raj	गौण शीर्ष : १०१, पंचायत राज
Group Head : (01)	गट शीर्ष : (०१)
Sub Group Head : (01) (01) Chief Minister Baliraja Shet / Panand Road Scheme (Scheme) (25152782)	उप गट शीर्ष : (०१) (०१) मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना (कार्यक्रम) (२५१५२७८२)

उपरोक्त नवीन लेखाशीर्ष निर्माण करण्यास महालेखाकार नागपूर कार्यालयाचे संदर्भ क्रमांक No.TM/Gr.III/UOR-23/2025-26/1979, दिनांक १३/१/२०२६ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

"मुख्यमंत्री बळीराजा शेत /पाणंद रस्ते योजना" या योजनेसाठी वजा वसुलीसाठी पुढीलप्रमाणे लेखाशीर्ष निर्माण करण्यास संदर्भाधिन क्र.९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

लेखाशीर्ष (इंग्रजी)	लेखाशीर्ष (मराठी)
Admin Dept : Revenue & Forest Department	प्रशासकीय विभाग : महसूल व वन विभाग
Demand No. : C-1	मागणी क्रमांक : सी-१

Major Head : 2515, Other Rural Development Programmes	प्रधान लेखाशीर्ष : २५१५, इतर ग्रामीण विकास कार्यक्रम
Sub Major Head : 00	उप प्रधान लेखाशीर्ष : ००
Minor Head : 911, Recovery of Overpayments	गौण शीर्ष : ९११, अतिप्रदानांची वसुली
Group Head : (00)	गट शीर्ष : (००)
Sub Group Head : (00) (01) Recovery of Overpayments (Scheme) (25152791)	उप गट शीर्ष : (००) (०१) अतिप्रदानांची वसुली (कार्यक्रम) (२५१५२७९१)

उपरोक्त वजा वसुलीसाठी नवीन लेखाशीर्ष निर्माण करण्यास महालेखाकार नागपूर कार्यालयाचे संदर्भ क्रमांक No.TM/Gr.III/UOR-26/2025-26/2154, दिनांक ११/२/२०२६ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

३.२ कॉर्पोरेट सामाजिक दायित्व (CSR) निधीचा वापर

- **स्वतंत्र बँक खाते:** सीएसआर (CSR - Corporate Social Responsibility) अंतर्गत विविध कंपन्या/संस्थांकडून प्राप्त होणारा निधी जमा करण्यासाठी उपविभागीय अधिकारी (SDO) यांच्या नावे बँकेत स्वतंत्र खाते उघडण्यास वित्त विभागाच्या व्यय-९ व कोषा प्रशा-५ (E-Comp. No १४९१९६४) या कार्यासनाच्या अनुक्रमे अनौसं क्र.६८५/२०२५/व्यय-९, दिनांक २४.१२.२०२५ व अ.नौ.सं. क्र.०४/२०२६/को.प्र.५, दिनांक ०८.०१.२०२६ रोजीच्या सहमतीस अनुसरुन मान्यता देण्यात आली आहे. या खात्यातील व्यवहारांचे नियमित वैधानिक लेखापरीक्षण (Audit) आणि शासकीय वित्तीय नियमांचे काटेकोर पालन करणे अनिवार्य राहील.
- **सीएसआर कंपन्यांद्वारे थेट कामे:** जर एखादी कंपनी किंवा संस्था विशिष्ट शेत/पाणंद रस्त्याचे काम स्वतःच्या सीएसआर निधीतून पूर्ण करून देण्यास तयार असेल, तर अशा प्रस्तावास विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीची मान्यता घेऊन थेट काम करण्याची परवानगी दिली जाईल.
- **यंत्रसामग्री व इंधन खर्च सहाय्य:** जर सीएसआर किंवा स्वयंसेवी संस्थांमार्फत (NGOs) जेसीबी/पोकलेन सारखी अवजड यंत्रसामग्री विनामोबदला उपलब्ध करून दिली जात असेल, तर अशा यंत्रांसाठी लागणाऱ्या इंधनाचा (डिझेल) खर्च उपविभागीय अधिकारी यांच्या बँक खात्यात उपलब्ध निधीतून करण्यास पूर्ण परवानगी राहील.

३.३ विविध शासकीय योजनांचे अभिसरण (Convergence of Schemes)

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी निधीची कमतरता भासू नये म्हणून खालील विविध योजनांमधील निधीचा कायदेशीर वापर शेत/पाणंद रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी संबंधित विभागांच्या धोरणात्मक चौकटीत राहून एकत्रितपणे (Convergence) करता येईल:

i) १५ व्या वित्त आयोग

ii) खासदार/आमदार स्थानिक विकास निधी

iii) ग्रामपंचायतीला जनसुविधांकरिता मिळणारे अनुदान

iv) मोठ्या ग्रामपंचायतीला नागरी सुविधांसाठी विशेष अनुदान

v) खनिज विकास निधी/ जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी

vi) ग्रामपंचायतींना मिळणारे महसूली अनुदान

vii) जिल्हा परिषद/पंचायत समिती सेसमधून उपलब्ध होणार निधी

viii) ग्रामपंचायतीचे स्व-उत्पन्न

ix) पेसा अंतर्गत उपलब्ध होणारा निधी (अनुसूचित क्षेत्रातील गावाकरिता)

x) ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार कार्यक्रम (आदिवासी लोकसंख्येच्या गावाकरिता)

xi) भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजना (आदिवासी शेतक-यांसाठी)

xii) नाविन्यपूर्ण योजना (सर्वसाधारण, आदिवासी व विशेष घटक योजना)

xiii) इतर जिल्हा योजना (Other District Scheme)

xiv) ग्रामीण भागातील गावांतर्गत मूलभूत सुविधा पुरविणे (२५१५-१२३८)

वरील योजनांच्या निधीमधून शेत/पाणंद रस्ता तयार करावयाचा असल्यास संबधित प्रशासकीय विभागाची कार्यपध्दती अवलंबविण्यात यावी.

३.४. आकस्मिक निधी (Contingency Fund)

कार्यान्वयीन यंत्रणेमार्फत अंदाजपत्रक तयार करताना किमान २ टक्के इतक्या आकस्मिक निधीची (Contingency Fund) तरतूद करण्यात यावी. सदर निधीचा वापर कार्यालयीन खर्च, गुणवत्ता तपासणी इ. साठी करावा. तसेच सदर निधीमधून शासनाच्या प्रचलित नियमानुसार बाह्ययंत्रणेद्वारे १ स्थापत्य अभियंत्याची नेमणूक करण्याची मुभा विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीस देण्यात येत आहे.

४: अतिक्रमण निष्कासन, दंडात्मक कार्यवाही, कायदेशीर बाबी व जमीन संपादन

४.१ अतिक्रमणे निष्कासित करण्याची संक्षिप्त व कायदेशीर प्रक्रिया

- गाव नकाशावर (Village Map) नोंद असलेल्या, महसुली अभिलेखात दर्शविलेल्या किंवा शासकीय जागेतील शेतरस्त्यांवर ज्या व्यक्तींनी अतिक्रमणे केली असतील, अशा व्यक्तींना संबंधित तहसीलदार हे ७ दिवसांची कायदेशीर नोटीस बजावतील.
- नोटीसची मुदत संपल्यानंतरही संबंधित व्यक्तीने स्वतःहून अतिक्रमण न काढल्यास, तहसीलदार हे महसूल व पोलीस यंत्रणेच्या सहाय्याने तात्काळ अतिक्रमण निष्कासित करतील.
- **कायदेशीर आधार:** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (MLRC) १९६६ चे कलम १४३ किंवा मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ चे कलम ५ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या रस्त्यांच्या हक्कावर किंवा ताब्यावर कोणतीही व्यक्ती पीक लागवड करू शकणार नाही किंवा अडथळा आणू शकणार नाही.

४.२ अतिक्रमणदारांवर कडक दंडात्मक व प्रशासकीय कार्यवाही

- जे अतिक्रमणधारक नोटिसीनंतरही रस्ता मोकळा करण्यास विरोध करतील, शेतरस्ता अडवतील किंवा तयार केलेल्या रस्त्याचे नुकसान करतील, अशा व्यक्तींचे आधार कार्ड (Aadhaar Card) आणि फार्मर आय-डी (Farmer ID) ५ वर्षांच्या कालावधीसाठी तात्काळ ब्लॉक (Block) केले जातील.
- अशा ब्लॉक केलेल्या व्यक्तींना पुढील ५ वर्षांसाठी शासनाच्या कोणत्याही अनुदानाच्या किंवा कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्यास पूर्णपणे अपात्र ठरवले जाईल.

४.३ फौजदारी कार्यवाही करणे

- एखादा रस्ता तयार झाल्यानंतर जर कोणीही या रस्त्याचे नुकसान केल्यास किंवा उपरोक्त रस्त्यावर खोदकाम केले व रस्ता नष्ट केला तर शासकीय मालमत्तेचे नुकसान केले म्हणून संबंधित दोषी व्यक्तीवर फौजदारी कार्यवाही करावी. कार्यवाही केल्यानंतरही पुन्हा नुकसान केल्यास इतर कायदेशीर बाबींचा अवलंब करून भारतीय न्याय संहिता कलम १२९ नुसार आवश्यक कार्यवाही करावी.

४.४ भूसंपादन निरसन व विनामूल्य जमीन हस्तांतरण (Donation/Relinquishment)

- **भूसंपादन नाही:** प्रस्तुत योजना राबविण्याकरीता कोणत्याही प्रकारचे भूसंपादन करण्यात येणार नाही किंवा कोणताही मोबदला दिला जाणार नाही.

- **हक्कसोड व दानपत्र नोंदणी :** पाणंद रस्त्याकरीता शेतकरी स्वेच्छेने स्वतःची जमीन देण्यास तयार असल्यास, त्यांच्याकडून नोंदणीकृत दानपत्र (Gift Deed)/बक्षीसपत्र / हक्कसोड पत्र (Relinquishment Deed) लिहून घेतले जाईल.
- **प्राधिकृत अधिकारी:** शासनाच्या वतीने संबंधित ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) हे नोंदणीकृत दस्तऐवज लिहून घेण्यास व स्वीकारण्यास कायदेशीररीत्या प्राधिकृत असतील.
- **७/१२ उताऱ्यावर नोंद व शुल्कमाफी:** दान दिलेल्या जमिनीच्या नोंदणीकृत अभिलेखाची नोंद सदर शेतक-याच्या ७/१२ उता-यावर घेण्यात येईल. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम कलम-३ मधील तरतुदींनुसार या दस्तऐवजांसाठी लागणारे मुद्रांक शुल्क (Stamp Duty) आणि नोंदणी फी (Registration Fee) पूर्णपणे माफ राहील. एकदा दान दिलेली जमीन शेतकऱ्याला पुनश्च मागे मागण्याचा कोणताही कायदेशीर हक्क राहणार नाही.

५: रस्ते बांधकामाचे तांत्रिक निकष, साहित्य, सवलती व गुणवत्ता

५.१ रस्त्याची परिमाणे, आर्थिक मर्यादा व प्राधान्यक्रम

- **कामाचे स्वरूप व आर्थिक मर्यादा:** ही योजना मुख्यत्वे मुरुमीकरणापर्यंतचे रस्ते बनवण्यासाठी असून, त्यासाठी रुपये १५.०० लाख प्रति किलोमीटर ही कमाल आर्थिक मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.
- **रस्त्याची तांत्रिक रुंदी:** सर्वसाधारण तांत्रिक मानकानुसार रस्त्याची माथा रुंदी (Top Width) ५.५० मीटर आणि तळाची रुंदी (Bottom Width) ९.१० मीटर प्रस्तावित आहे. परंतु, प्रत्यक्ष क्षेत्रावर उपलब्ध असलेली रुंदी जर १२ फूट ते २० फूट या दरम्यान असेल, तर उपलब्ध रुंदीनुसार रस्त्याचे बांधकाम करण्यात यावे.
- **कामांचा प्राधान्यक्रम:** प्रथम प्राधान्याने गाव नकाशावर नोंद असलेले पारंपरिक रस्ते पूर्ण करावेत. गाव नकाशावरील सर्व रस्ते पूर्ण झाल्याची खात्री झाल्यानंतरच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम १४३ खालील मंजूर झालेले व नकाशांवर घेतलेले रस्ते जी काही रुंदी आहे त्या रुंदीचे रस्ते हाती घेण्यात यावेत.

५.२ खडीकरण व डांबरीकरणाबाबतचे स्पष्ट नियम

- **खडीकरणास परवानगी:** निश्चित केलेल्या रु.१५ लाखांच्या आर्थिक मर्यादेत बसत असल्यास किंवा अभिसरण (Convergence)/CSR मधून अतिरिक्त निधी उपलब्ध होत असल्यास रस्त्याचे खडीकरण (Gravelling/WBM) करण्यास मान्यता राहील.
- **डांबरीकरणास सक्त मनाई:** कोणत्याही परिस्थितीमध्ये या योजनेच्या निधीतून डांबरीकरणाची (Asphalting/Bituminous Work) कामे घेता येणार नाहीत.

- **मोठ्या पुलांना मनाई:** मोठ्या पुलांची (Bridges/Major Culverts) कामे या योजनेतून घेता येणार नाहीत. केवळ पाण्याच्या विसर्गासाठी CD Work (Cross Drainage Work / नळकांडी पूल) बांधण्याची परवानगी राहील.

- **यापूर्वी इतर योजनेतून काम झालेले / मंजूर असलेले रस्ते** :- गाव नकाशांवरील रस्ते हे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ कलम २० मधील तरतुदीनुसार शासनाच्या मालकीचे आहेत. त्यामुळे सदर रस्त्यांची कामे मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेच्या मापदंडाप्रमाणे झाल्यानंतर ज्या शेत रस्त्यांवर यापुर्वी इतर कोणत्याही योजनेतून मातीकाम/मुरुमीकरण पूर्ण झाले असून त्यास किमान एक वर्षाचा कालावधी झालेला आहे याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेकडून प्राप्त झाल्यानंतर, अशा रस्त्यांचा मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेमध्ये समावेश करता येईल. अशा रस्त्यांची खडीकरणापर्यंतची कामे करण्याची मुभा राहील. खडीकरणाकरीता प्रती किलोमीटर लागणारा खर्च जिल्हास्तरीय समितीने ठरवून द्यावा. मात्र कोणत्याही परिस्थितीत अशा रस्त्यांच्या डांबरीकरणाची कामे मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेअंतर्गत घेता येणार नाहीत.
- मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजनेमध्ये ज्या कामांना फक्त प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे मात्र अद्याप काम सुरु करण्यात आलेले नाही किंवा निधी वितरण करण्यात आलेले नाही असे रस्ते मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेअंतर्गत घ्यावयाचे असल्यास सदर रस्त्यांना मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजनेमध्ये दिलेली प्रशासकीय मान्यता संबंधित विभागाने रद्द करावी. सदरची प्रशासकीय मान्यता रद्द झाल्याची खातरजमा केल्यानंतरच हे रस्ते मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेअंतर्गत घेता येतील. याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित जिल्ह्याचे उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांची राहील.

५.३ गौण खनिज वापर व रॉयल्टी (Royalty) पूर्ण माफ

- **वापरास पात्र साहित्य:** रस्त्याच्या भरावासाठी व मुरुमीकरणासाठी स्थानिक परिसरातील शेत/पांदण रस्त्याच्या ५ कि.मी. च्या परिसरात लहान नदी/महसूली नाले/ कोल्हापूरी-साठवण बंधारे/मामा तलाव/ जलसंधारण विभागाचे तलाव या स्त्रोतांचे खोलीकरण करुन यातून निघणारी माती/मुरुम/दगड/काळी रेती ही पांदण रस्ते करीता वापरावी.

- **रॉयल्टी व DMF माफी:** महसूल विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०३ एप्रिल, २०२५ मधील सूचनांनुसार या योजनेसाठी वापरण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या गौण खनिजांवर कोणतेही स्वामित्व शुल्क (Royalty) किंवा जिल्हा खनिज प्रतिष्ठान (DMF) निधी आकारला जाणार नाही.

- **झिरो रॉयल्टी पास (Zero Royalty Pass):** कंत्राटदाराला साहित्य वाहतुकीसाठी आवश्यक असणारे 'झिरो रॉयल्टी पास' संबंधित तहसीलदारांनी कोणतीही दिरंगाई न करता तात्काळ मंजूर करून उपलब्ध करून द्यावेत.
- रस्त्यालगत पुरेशी खोदकाम सामुग्री माती व मुरूम उपलब्ध न झाल्यास लगतच्या शेतीमधून संबंधित शेतकऱ्यांच्या पुर्वपरवानगीने किंवा उपलब्ध शासकीय जमीनीमधून माती व मुरूम आणता येईल. त्यासाठी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल विभागाच्या दि.२८/०३/२०२० रोजीच्या अधिसूचनेनुसार कुठल्याही पर्यावरण अनुमतीची गरज राहणार नाही.
- काही अपरिहार्य कारणास्तव काही ठिकाणी मुरुम किंवा दगडखाण खूप दूर असेल तर रु.१५ लक्ष किंमतीच्या मर्यादेपेक्षा अंदाजपत्रकीय किंमत जास्त येत असेल तर रु.१५ लक्ष पेक्षा वाढीव खर्च हा इतर कोणत्याही योजनेच्या अभिसरणातून किंवा सीएसआर मध्ये प्राप्त निधीतून करण्यात यावा.
- कोळसा खाणीतील मलबा (Overburden) तसेच औष्णिक वीज प्रकल्पातील फ्लाय ॲश (Fly Ash) व बॉटम ॲश (Bottom Ash) यांचा वापर करण्यास मान्यता :-
    १. राज्यातील एनटीपीसी (NTPC) आणि इतर सर्व शासकीय/निमशासकीय थर्मल पॉवर स्टेशनमधून निर्माण होणारी राख (Fly Ash/Bottom Ash) "मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना" अंतर्गत तयार करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या कामासाठी संबंधित प्रकल्पांकडून प्राधान्याने उपलब्ध करून घ्यावी.
    २. मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेकरीता कोळसा खाणींमधून उत्खनन करताना निघणारी माती आणि मलबा (Overburden) संबंधित कोळसा खाण संस्थांकडून प्राधान्याने उपलब्ध करुन घ्यावा.
    ३. या योजनेअंतर्गत पाणंद रस्त्यांच्या भरावासाठी वापरण्यात येणारी राख/ कोळसा खाणींमधून उत्खनन करताना निघणारी माती आणि मलबा (Overburden)/ पडलेल्या इमारतींचा मलबा व माती यावर महसूल विभागामार्फत कोणत्याही प्रकारचे स्वामित्वधन (Royalty) किंवा जिल्हा खनिज प्रतिष्ठान (DMF) निधीची आकारणी केली जाणार नाही.
    ४. मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेकरीता निश्चित केलेल्या कार्यान्वयीन यंत्रणांनी शेत/पाणंद रस्ते तयार करताना वापरण्यात येणा-या कोळसा खाणींमधून उत्खनन करताना निघणारी माती आणि मलब्याचा (Overburden) व लिग्नाइट आधारित ताप विद्युत प्रकल्पांमधून (Thermal Power Plants - TPPs) निघणाऱ्या राखेची (फ्लाय ॲश आणि बॉटम ॲश) तांत्रिक व्यवहार्यता प्रमाणित करून घेणे आवश्यक राहील.

५. रस्त्यांच्या डिझाइन व मानकानुसार राखेचा/मलब्याचा वापर केवळ भरावासाठी व मजबुतीकरणाच्या थरासाठी (Embankment/Sub-grade) करताना आवश्यक ती कार्यप्रणाली संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेने निश्चित करावी.

६. ज्या जिल्ह्यांमध्ये कोळसा खाणी व लिग्नाइट आधारित ताप विद्युत प्रकल्प (Thermal Power Plants – TPPs) आहेत त्या जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांनी संबधित संस्थाशी संपर्क साधून सामंजस्य करार (MoU) करून फ्लाय ॲश व माती/मलब्याचा पुरवठा निश्चित करावा.

७. कोळसा खाणींमधून उत्खनन करताना निघणारी माती आणि मलब्याचा (Overburden) व लिग्नाइट आधारित ताप विद्युत प्रकल्पांमधून (Thermal Power Plants – TPPs) निघणाऱ्या राखेचा (फ्लाय ॲश आणि बॉटम ॲश) वाहतूक खर्च या योजनेच्या मंजूर अंदाजपत्रकात समाविष्ट करावा.

८. राखेची वाहतूक करताना ती उडून पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

९. या सवलतीचा लाभ केवळ अधिकृत मंजूर पाणंद रस्त्यांच्या कामांसाठीच घेता येईल. राखेचा अन्य कोणत्याही व्यावसायिक कारणासाठी गैरवापर होणार नाही, याची जबाबदारी संबंधित यंत्रणेच्या (उदा. ग्रामविकास/सार्वजनिक बांधकाम विभाग) कार्यकारी अभियंत्यांची व महसूल अधिकाऱ्यांची राहील.

५.४ मोजणी व पोलीस बंदोबस्त शुल्क माफी

- **मोफत मोजणी:** शेत/पाणंद रस्त्यांकरीता मोजणी ही तातडीची मोजणी म्हणून करावी. सदर मोजणीकरिता भूमी अभिलेख विभागामार्फत कोणतेही मोजणी शुल्क आकारण्यात येऊ नये.
- **मोफत पोलीस बंदोबस्त:** तहसीलदार यांनी आदेशित केल्यानंतर रस्त्यावरील अतिक्रमणे काढताना, मोजणी करताना किंवा प्रत्यक्ष काम करताना कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी लागणारा पोलीस बंदोबस्त पूर्णपणे विनामूल्य (No Cost) उपलब्ध करून देण्यात यावा त्याकरिता कोणतेही शुल्क आकारण्यात येऊ नये.

५.५ गुणवत्ता नियंत्रण, चाचण्या व दोष निवारण कालावधी (DLP)

- **दोष निवारण कालावधी (Defect Liability Period – DLP):** रस्ता पूर्ण झाल्यानंतर त्याचा दोष निवारण कालावधी किमान ६ महिने किंवा १ पूर्ण पावसाळा (यापैकी जे नंतर संपेल ते) राहील. या कालावधीत रस्त्याची काही खराबी झाल्यास कंत्राटदाराला स्वतःच्या खर्चाने दुरुस्ती करावी लागेल.
- **सुरक्षा अनामत रक्कम (Security Deposit):** कंत्राटदाराला देण्यात आलेल्या कामाच्या रकमेच्या २% इतकी रक्कम सुरक्षा ठेव म्हणून घेण्यात यावी. या व्यतिरिक्त अतिरिक्त सुरक्षा रक्कम घेण्यात येऊ नये. दोष दायित्व कालावधी संपल्यानंतर सुरक्षा ठेव रक्कम परत करण्यात यावी.

- **कोर कटिंग चाचणी (Core Cutting Test):** मुरुम व खडीच्या थराची योग्य दबाई (Compaction) व जाडी तपासण्यासाठी Core Cutting चाचणी बंधनकारक असेल.
- **कार्यकारी अभियंत्यांची प्रत्यक्ष तपासणी:** कामाचे देयक मंजूर करण्यापूर्वी संबंधित कार्यकारी अभियंत्यांनी प्रत्यक्ष क्षेत्रावर जाऊन रस्त्याच्या गुणवत्तेची वैयक्तिक तपासणी करणे बंधनकारक राहील.
- **जिओ-टॅगिंग व ड्रोन चित्रीकरण (Geo-tagging & Drone Shooting):** कंत्राटदाराने कामाची प्रत्यक्ष सुरुवात करण्यापूर्वी (Before Work) आणि काम पूर्ण झाल्यानंतर (After Work) दिनांक व वेळेसह जिओ-टॅग केलेले हाय-डेफिनिशन फोटो आणि ड्रोन व्हिडिओ शूटिंग सादर करणे अनिवार्य असेल.

६: दुतर्फा वृक्ष लागवड, संवर्धन व हरित आच्छादन (Tree Plantation)

शेत/पाणंद रस्त्याच्या दुतर्फा मनरेगा अंतर्गत वृक्ष लागवड/बिहार पॅटर्न नुसार वृक्ष लागवड करणे आवश्यक राहील. पांदण रस्त्यांची सीमा ही अधिसूचित झाडे लावून निश्चित करावी. शेत/पाणंद रस्त्यांच्या दोन्ही बाजूस वृक्षलागवडीबाबत खालीलप्रमाणे सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. राज्यातील सर्व शिव/पाणंद रस्त्यांच्या दोन्ही बाजूस उपलब्ध जागेनुसार वन विभागाच्या धोरणानूसार संबंधित जिल्ह्याच्या कृषि हवामान क्षेत्रास अनुरूप अधिसूचित (Scheduled) झाडे लावण्याचे नियोजन करावे.
२. वृक्ष लागवडीचे अभियान हे जिल्हा नियोजन समिती, खनिकर्म निधी, सामाजिक दायित्व निधी, VB-G RAM G, स्वयंसेवी संस्था, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणे यांच्या योगदानातून राबविण्यात यावे.
३. संबंधित गावाच्या ग्रामपंचायतीने वृक्ष लागवडीनंतर किमान १० वर्षे जतन व संवर्धन, नियमित पाणीपुरवठा, पुर्नलागवड, संरक्षण व देखभाल सुनिश्चित करण्यात यावी.
४. वृक्षलागवडीचे मूल्यांकन केवळ लागवड केलेल्या रोपांच्या संख्येवर न करता जिवंत रोपांचे प्रमाण (Survival Rate), वृक्षवाढ, हरित आच्छादन व पर्यावरणीय परिणाम यांच्या आधारे करण्यात यावे.
५. ग्रामपंचायत, शेतकरी गट, स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट, युवक मंडळे व स्थानिक नागरिकांचा लोकसहभाग प्रोत्साहित करण्यात यावा.
६. दुष्काळ, जनावरांची चराई, आग, कीड व रोग यांपासून संरक्षणासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात याव्यात.
७. रस्त्याच्या दुतर्फा वृक्षरोपणासाठी जागा अपुरी पडल्यास विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीने स्थानिक भौगोलिक परिस्थितीनुसार निर्णय घ्यावा.

शेत/पाणंद रस्त्यांच्या दोन्ही बाजूस वृक्षलागवडीबाबत दिनांक २४.०७.२०२६ शासन निर्णयातील सुचनांप्रमाणे कार्यवाहीची दक्षता घेण्यात यावी.

७: विविध प्रशासकीय यंत्रणांच्या स्पष्ट जबाबदाऱ्या

७.१ ग्रामपंचायतीची जबाबदारी

- स्थानिक शेतकऱ्यांच्या मागणीनुसार गावातील सर्व शेत/पाणंद रस्त्यांची यादी व वार्षिक विकास आराखडा तयार करून तो मंजुरीसाठी विधानसभा क्षेत्र समितीकडे सादर करणे.
- रस्त्यावरील अतिक्रमणधारक शेतकऱ्यांच्या ग्रामसभेत किंवा विशेष बैठका आयोजित करून समुपदेशनाद्वारे (Counseling) स्वेच्छेने अतिक्रमणे काढण्यास प्रवृत्त करणे.
- ग्रामपंचायत स्तरावर प्रकरण निकाली लागत नसल्यास अशी प्रकरणे विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीकडे सादर करून विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीच्या निर्देशानुसार नियमानुसार पोलीस यंत्रणेची मदत घेणे.
- रस्ता पूर्ण झाल्यानंतर त्याची नोंद ग्रामपंचायतीच्या मत्ता नोंदवहीत (Asset Register), रस्ते नोंदवहीत आणि महसुली गाव नमुना नंबर १ (फ) मध्ये तात्काळ करून घेणे.

७.२ महसूल यंत्रणेची जबाबदारी

- **जिल्हाधिकारी (District Collector):** संपूर्ण जिल्ह्यामध्ये योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे, विविध विभागांमध्ये समन्वय साधणे. या कामासाठी उपजिल्हाधिकारी-रोहयो हे जिल्हा समन्वयक अधिकारी म्हणून काम पाहतील.
- **विभागीय आयुक्त (Divisional Commissioner):** विभाग स्तरावर योजनेचा नियमित आढावा घेणे व संनियंत्रण करणे. यासाठी उपायुक्त-रोहयो हे विभागीय समन्वयक असतील.
- **तहसीलदार (Tahsildar):** ग्रामपंचायतीकडून रस्ता अतिक्रमण मुक्त करण्यासाठी प्रस्ताव आल्यास, अतिक्रमणधारक शेतकऱ्यांची बैठक घेऊन त्यांना अतिक्रमण दूर करण्याची सूचना करावी. अतिक्रमणधारक शेतकरी अतिक्रमण काढण्यास तयार नसल्यास, महसूल नियमावलीनुसार कार्यवाही करून अतिक्रमण काढावे. यासाठी आवश्यक असल्यास, शासनाच्या खर्चाने तात्काळ मोजणी करून खुणा निश्चित कराव्यात व कोणतेही शुल्क आकारू नये. मुदतीनंतर पोलीस बंदोबस्तात अतिक्रमणे दूर करणे; कंत्राटदारांना मोफत 'झिरो रॉयल्टी पास' वेळेवर देणे; तसेच कलम १४३ व इतर कायदेशीर आदेशांची तात्काळ अंमलबजावणी करणे.
- **ग्राम महसूल अधिकारी - तलाठी (Talathi):** जेसीबी/पोकलेनद्वारे अतिक्रमणे काढताना किंवा रस्त्याच्या कडेला चर (Trenches) खोदताना प्रत्यक्ष क्षेत्रावर उपस्थित राहणे; रस्त्यावर

टाकल्या जाणाऱ्या माती व मुरूमाचा वापर उपरोक्त शेत/पाणंद रस्त्यासाठीच होत असल्याबाबत खातरजमा करावी व गैरवापर होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७.३ पोलीस यंत्रणेची जबाबदारी

- महसूल विभाग किंवा कार्यान्वयीन यंत्रणेने मागणी करताच, कोणत्याही विलंबाशिवाय विनामूल्य पोलीस बंदोबस्त (Police Protection) उपलब्ध करून देणे.
- उपरोक्त काम हे शासकीय काम असल्याने रस्त्याच्या कामात प्रत्यक्ष अडथळा आणणाऱ्या, किंवा तयार केलेल्या सरकारी रस्त्याचे नुकसान करणाऱ्या असामाजिक तत्वांवर तात्काळ फौजदारी गुन्हे (Criminal Cases) दाखल करून कायदेशीर कारवाई करणे.

८: त्रिस्तरीय संनियंत्रण समित्यांचे गठन व कार्यकक्षा

"मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना" राबविण्याकरिता विविध यंत्रणेमध्ये सुसूत्रता व जबाबदारीच्या स्पष्टतेसाठी पुढीलप्रमाणे समित्या स्थापना करण्यात येत आहेत.

८.१ राज्यस्तरीय समिती :-

अ.क्र .	पदनाम	समितीमधील पद
१	मा.मंत्री (महसूल)	अध्यक्ष
२	मा.मंत्री (ग्रामविकास)	सदस्य
३	मा.मंत्री (रोजगार हमी योजना)	सदस्य
४	मा.राज्यमंत्री (वित्त, नियोजन, कृषि, मदत व पुनर्वसन, विधि व न्याय, कामगार)	सदस्य
५	मा.श्री. राजेश क्षीरसागर, विधानसभा सदस्य	सदस्य
६	मा.श्री. संजय बनसोडे, विधानसभा सदस्य	सदस्य
७	मा.श्री. रणधिर सावरकर, विधानसभा सदस्य	सदस्य
८	मा.श्री. अभिमन्यू पवार, विधानसभा सदस्य	सदस्य
९	मा.श्री. महेश शिंदे, विधानसभा सदस्य	सदस्य
१०	मा.श्री. दिलीप बनकर, विधानसभा सदस्य	सदस्य
११	मा.श्री. अनिल पाटील, विधानसभा सदस्य	सदस्य
१२	मा.श्री. हेमंत पाटील, विधानपरिषद सदस्य	सदस्य
१३	मा.श्री. समीर कुणावार, विधानसभा सदस्य	सदस्य
१४	मा.श्री. सत्यजित देशमुख, विधानसभा सदस्य	सदस्य
१५	मा.श्री. विठ्ठल लंघे, विधानसभा सदस्य	सदस्य
१६	मा.श्री. सुमित वानखेडे, विधानसभा सदस्य	सदस्य
१७	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई	सदस्य

१८	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (गृह), मंत्रालय, मुंबई	सदस्य
१९	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई	सदस्य
२०	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई	सदस्य
२१	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सार्वजनिक बांधकाम), मंत्रालय, मुंबई	सदस्य
२२	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (ग्रामविकास), मंत्रालय, मुंबई	सदस्य
२३	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (आदिवासी विकास), मंत्रालय, मुंबई	सदस्य
२४	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (उद्योग), मंत्रालय, मुंबई	सदस्य
२५	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (रोजगार हमी योजना), मंत्रालय, मुंबई	सदस्य
२६	जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे	सदस्य
२७	सह सचिव/उपसचिव (भूमापन/ल-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.	सदस्य सचिव

- **राज्यस्तरीय समितीची कार्यकक्षा :-**

१) योजनेचा वेळोवेळी आढावा घेऊन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या सुधारणा करणे.

२) योजनेसंदर्भातील क्षेत्रीय स्तरावरील अडचणींचे निराकरण करणे.

३) योजनेंतर्गत स्वतंत्र लेखाशीर्षामध्ये उपलब्ध असलेल्या निधीचे जिल्हानिहाय वितरण करणे.

८.२. जिल्हास्तरीय कार्यकारी समिती :-

अ.क्र.	पदनाम	समितीमधील पद
१	मा. पालकमंत्री	अध्यक्ष
२	जिल्ह्यातील सर्व मा.विधानपरिषद सदस्य	सदस्य
३	जिल्हाधिकारी	सदस्य
४	मुख्य कार्यकारी अधिकारी	सदस्य
५	जिल्हा पोलीस अधिक्षक	सदस्य

६	प्रकल्प संचालक (जि.ग्रा.वि.यं.)/ उपमुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा)	सदस्य
७	कार्यकारी अभियंता (बांधकाम), सा.बां. विभाग	सदस्य
८	कार्यकारी अभियंता (PMGSY/CMGSY)	सदस्य
९	कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद	सदस्य
१०	जिल्हा नियोजन अधिकारी	सदस्य
११	जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख	सदस्य
१२	उप जिल्हाधिकारी (रोहयो)	सदस्य सचिव

- **जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची कार्यकक्षा :-**
  १. मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते या कार्यक्रमास व्यापक प्रसिध्दी देऊन जास्तीत जास्त ग्रामपंचायतीना यामध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे, शेत/पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमण काढण्याकरिता ग्रामपंचायत, महसूल यंत्रणा, भूमि अभिलेख विभाग, पोलीस विभाग इत्यादी विभागाच्या नियमित बैठका घेऊन त्यामध्ये आकस्मित उद्भवणारे प्रश्न सोडविणे.
  २. कार्यक्रमाचा वेळोवेळी आढावा घेणे व क्षेत्रीय स्तरावरील अडचणींचे निराकरण करणे,
  ३. परिच्छेद क्र.३.३ मध्ये नमुद केलेल्या योजनेतून अधिकाधिक निधी उपलब्ध करून घेऊन जिल्ह्यात अधिकाधिक लांबीचे रस्ते तयार करणे,
  ४. जिल्हास्तरीय समितीने तांत्रिक अर्हता (Technical Qualification) निश्चित करुन प्रति तास दर (L१ rate) अंतिम करावेत. सदरचे दर अंतिम करण्याच्या प्रक्रियेदरम्यान जिल्हास्तरावर कंत्राटदारांकडून कोणतीही Performance Security म्हणून सुरक्षा ठेव घेऊ नये.
  ५. ज्या ठिकाणी सीएसआर/एनजीओ यांच्या माध्यमातून उत्खनन यंत्रसामुग्री, रोडरोलर, दगड, मुरूम वाहतुकीकरिता लागणारी यंत्रसामुग्री विनामोबदला उपलब्ध होत असल्यास त्याकरिता डिझेल उपलब्ध करून देण्याबाबत कार्यपध्दती निश्चित करून डिझेलसाठी निधी उपलब्ध करून देणे व उपविभागीय अधिकारी यांच्या नांवे उघडलेल्या बॅक खात्यातून निधी खर्च करण्यास परवानगी देणे.
  ६. जिल्हास्तरीय समितीने किमान दर ३ महिन्यांनी या योजनेच्या प्रगतीचा आढावा घ्यावा.

८.३. विधानसभा क्षेत्रस्तरीय समिती :-

अ.क्र.	पदनाम	समितीमधील पद
१	मा.विधानसभा सदस्य	अध्यक्ष
२	मा. मंत्री (महसूल) यांनी निवड केलेली व्यक्ती	सह अध्यक्ष
३	उप विभागीय अधिकारी	सदस्य सचिव
४	उप विभागीय पोलीस अधिकारी	सदस्य
५	तहसिलदार	सदस्य
६	गट विकास अधिकारी, पंचायत समिती	सदस्य
७	उप अधीक्षक, भूमि अभिलेख	सदस्य
८	तालुका कृषी अधिकारी	सदस्य
९	विधानसभा क्षेत्रातील सर्व वनपरिक्षेत्र अधिकारी	सदस्य
१०	उप अभियंता (बांधकाम), सा.बां. विभाग	सदस्य
११	उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद	सदस्य
१२	५ प्रगतशील शेतकरी	सदस्य
१३	पंचायत समिती कार्यालयातील लेखाधिकारी	सदस्य

- जर संबंधित विधानसभा सदस्य हे मा.मंत्री असतील तर त्याठिकाणी सदर मा.मंत्री ठरवतील ते लोकप्रतिनिधी विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीचे अध्यक्ष असतील.
- विधानसभा क्षेत्रामध्ये समावेश असलेल्या सर्व तालुक्यातील उपरोक्त नमूद सर्व अधिकाऱ्यांचा समितीमध्ये समावेश असेल.
- समितीच्या अध्यक्षांना आवश्यक वाटतील असे तालुक्यातील इतर अधिकारी यांना निमंत्रित करण्याचा अधिकार असेल.
- विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीस मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील. जिल्हाधिकारी यांनी सदर समिती गठीत करण्याबाबतचे आदेश निर्गमित करावेत.
- तसेच एका विधानसभा क्षेत्रामध्ये एकापेक्षा जास्त उपविभागीय अधिकारी असतील तर त्यांच्या कार्यक्षेत्राचा विचार करुन विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीच्या सदस्य सचिव नियुक्तीबाबत जिल्हाधिकारी यांनी अंतिम निर्णय घ्यावा.
- विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीमध्ये ५ प्रगतशील शेतकरी निवडण्याची पध्दत:- विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीमध्ये संबंधित विधानसभा क्षेत्रातील कोणत्याही ५ शेतक-यांचा समावेश करण्याची मुभा विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीचे अध्यक्ष म्हणून विधानसभा सदस्य यांना राहील.

- **विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीची कार्यकक्षा :-**

१. सदर समितीने प्रथमतः तालुक्यातील सर्व रस्त्यांचे सिमांकन करण्याच्या कार्यवाहीचा आढावा घ्यावा.

२. प्रत्येक गावात भूमि अभिलेख विभागाने सिमांकन केलेले महसुली नकाशा लावण्यात आला आहे किंवा कसे?, याबाबत समितीने सिमांकनाचा आढावा घ्यावा.

३. तालुक्यातील भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन रस्त्यांचा आराखडा/अंदाजपत्रक तयार करावे व वाढीव अधिकच्या तासांकरीता मान्यता देणे.

४. मान्यता प्रदान केलेल्या कामांचा मासिक प्रगती अहवाल विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीचे सदस्य सचिव यांनी वर नमूद जिल्हास्तरीय समितीस सादर करावा. तसेच जिल्हास्तरीय समितीने जिल्ह्याचा एकत्रित मासिक अहवाल शासनास सादर करावा.

५. समितीने शेत रस्त्यांच्या कामांसाठी कार्यकारी यंत्रणेची निवड करावी.

६. एका गावाहून दुसऱ्या गावास जाणारे जास्त लांबीच्या शेत रस्त्यांचे ग्रामिण रस्ते (VR-Village Road) म्हणून रूपांतरीत करण्यासाठी ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय दि.०४/१२/२०२३ अन्वये निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता करणाऱ्या रस्त्यांचे प्रस्ताव विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीने ग्रामविकास विभागाकडे शिफारशीसह पाठवावेत.

७. सदर योजनेंतर्गत शेत रस्त्यांचे सिमांकन केल्यानंतर सदर रस्त्यांच्या दूतर्फा वृक्ष लागवड करण्याबाबत संदर्भ क्र.४ येथे नमूद शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी.

८. मुख्यमंत्री-बळीराजा शेत/पाणंद रस्ते कार्यक्रमाला व्यापक प्रसिध्दी देऊन ग्रामपंचायतीकडून शेत/पाणंद रस्ते अतिक्रमण मुक्त करण्याकरिता प्रस्ताव प्राप्त करून घेणे.

९. ज्या ठिकाणी रस्ते अतिक्रमण केले आहे, अशा ठिकाणी शेतकऱ्यांची बैठक घेणे व शेतकऱ्यांना समजावून सांगणे व आवश्यकता असल्यास पोलिस यंत्रणेची मदत घ्यावी.

१०. एखादा रस्ता तयार झाल्यानंतर जर कोणीही या रस्त्याचे नुकसान केल्यास किंवा उपरोक्त रस्त्यावर खोदकाम केले व रस्ता नष्ट केला तर शासकीय मालमत्तेचे नुकसान केले म्हणून पोलीस तक्रार करण्याची जबाबदारी संबंधित तहसीलदार यांची राहील.

११. शेत/ पाणंद रस्त्याचे अतिक्रमण काढण्याकरीता पोलीस विभागामार्फत कार्यवाही करणे ही जबाबदारी विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीची व तहसीलदार यांची राहील.

१२. या योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्याकरिता विधानसभा सदस्यांनी किमान दर ३ महिन्यांनी विधानसभा क्षेत्रस्तरीय कार्यकारी समितीची बैठक घ्यावी.

१३. महसूल व वन विभागाच्या दि.२६.०८.२०२५, दि. २९.०८.२०२५ च्या शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे.

१४.समितीने अंदाज पत्रकानुसार शेत रस्त्यांचे काम होत आहे किंवा कसे ? याची पाहणी करावी.

९: तांत्रिक संगणकीय प्रणाली, पोर्टल व डिजिटल संनियंत्रण

९.१ PM GatiShakti Portal वर मॅपिंग

- नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.सुसंके-२०२५/प्र.क्र.८२/का.१४१८, दि.१९.११.२०२५ अन्वये विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन या योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या आणि प्रस्तावित असलेल्या सर्व शेत/पाणंद रस्त्यांचे भौगोलिक स्थान (Geographical Coordinates) **-पीएम गतीशक्ती पोर्टल (PM GatiShakti Portal)** वर डिजिटल मॅपिंग करणे बंधनकारक आहे

९.२ Unique MHUID जनरेशन

- नियोजन विभाग, शासन निर्णय क्रं.युपासु-२०२५/प्र.क्र.७/का.१४१२, दि. २५.०८.२०२५ मधील सुचनांनुसार प्रस्तुत योजनेअंतर्गत पारदर्शकता आणण्यासाठी प्रत्येक मंजूर रस्त्याच्या कामाकरिता **MHUID (Maharashtra Unique Identification Code)** जनरेट करणे अनिवार्य असेल.

९.३ Machine Output Factors (मशिनरी उत्पादन क्षमता निकष)

- मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेअंतर्गत रस्ते कामासाठी लागणारी यंत्रसामग्री (उदा. Excavator/JCB) एका तासात किती घनमीटर (Cubic Meter) खोदाईचे काम करेल, याचे परिमाण हे प्रामुख्याने संबंधित भूस्तराच्या (Soil/Strata Type उदा. Hard Murrum, Soft Rock, किंवा Ordinary Soil) प्रकारावर अवलंबून असते. भौगोलिकदृष्ट्या एकाच प्रकारच्या भूस्तरासाठी मशिनरीची कार्यक्षमता संपूर्ण राज्यात सारखीच राहणे अपेक्षित असले, तरी प्रत्यक्षात स्थानिक पातळीवर भूस्तराची एकसमानता (Uniformity) आढळून येत नाही. यास्तव, भौगोलिक विविधतेचा विचार करून, संबंधित कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना (Executive Engineer) यांनी संबधित जिल्ह्यातील भूस्तराची स्थानिक पाहणी करावी. त्यानुसार मशिनरीचे परिमाण' (Machinery Output Factors) निश्चित करून देण्यात यावे.

९.४ स्वतंत्र ऑनलाईन पोर्टल व मोबाईल ॲप

- योजनेच्या संपूर्ण संनियंत्रणासाठी, अर्जांच्या नोंदीसाठी, देयकांच्या मंजुरीसाठी व जिओ-टॅग्ड फोटोंच्या अपलोडिंगसाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, पुणे यांनी एक स्वतंत्र ऑनलाईन पोर्टल व मोबाईल ॲप्लिकेशन (Mobile App) विकसित करून

कार्यान्वित करावे. तसेच वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार त्यामध्ये अद्यावतीकरण करण्याची कार्यवाही करावी.

१०: शासन निर्णयासोबत जोडलेली परिशिष्टे:-

- अतिक्रमणमुक्त शेत/पाणंद रस्ता मजबुतीकरण करण्याबाबतची कार्यपध्दती सोबतच्या **परिशिष्ट क्र.१** मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील.
- यंत्रसामुग्रीचे (यंत्रसामुग्री + इंधन + मनुष्यबळ) प्रती तासिका दर निविदाव्दारे दरपत्रक मागविण्याकरीता निविदा प्रारुप **परिशिष्ट क्र.२** मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील.
- जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेली तांत्रिक अर्हता आणि अंतिम केलेला प्रती तास दर आधारभूत म्हणून विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीने कंत्राटदारांचे जास्तीत जास्त पॅनल तयार करताना नेमकी कोणती प्रशासकीय व कायदेशीर कार्यपद्धती (उदा. जाहिरात प्रसिद्धी, अर्जाचा नमुना, छाननी प्रक्रिया इत्यादी) राबवावी याबाबत क्षेत्रीय स्तरावर स्पष्टता व्हावी याकरिता वापरावयाचा जाहीर सूचनेचा नमुना तयार करण्यात आला असून तो सोबत **परिशिष्ट-३** येथे जोडला आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१११८११२२००३७४८ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIKAS SHANKAR KHARAGE

Digitally signed by VIKAS SHANKAR KHARAGE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=957397JC3F3A12761AE0FE8E3A40ABF3EEC83D868BDEC816DB838EF1F6F491C8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=CA3b4BF80D2F0524E55EE5EA334CC3844C4BA1D8958BF9AE1C49#5F0F6F980681, cn=VIKAS SHANKAR KHARAGE
Date: 2026.11.18 16:53:24 +05'30'

(विकास खारगे)

अपर मुख्य सचिव (महसूल), महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण), यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ), महाराष्ट्र शासन यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. लोकसभा/राज्यसभा सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,

८. मा. विधानसभा/विधान परिषद सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,

९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,

१०.सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मुंबई,

११.जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे

१२.सर्व विभागीय आयुक्त

१३.आयुक्त, नरेगा नागपूर

१४.आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे

१५.संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे

१६.मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे

१७.संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे

१८.सर्व जिल्हाधिकारी.

१९.सर्व पोलीस अधिक्षक

२०.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

२१.सर्व अधिक्षक अभियंता, पाटबंधारे/सर्व अधिक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर)

२२.संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

२३.महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरिता)

२४.महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ व २. मुंबई व नागपूर.

२५.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २. मुंबई व नागपूर.

२६.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

२७.सर्व उपसचिव/सर्व अवर सचिव व सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग

२८. निवडनस्ती (पाणंद रस्ते)

परिशिष्ट क्र.१

शासन निर्णय क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र.०२/पाणंद रस्ते, दिनांक १८ नोव्हेंबर, २०२६.

अतिक्रमणमुक्त शेत/पाणंद रस्ता मजबुतीकरण करण्याची कार्यपध्दती खालीलप्रमाणे :-

भाग १ : यंत्रसामुग्रीचे दर निश्चित करणे, कंत्राटदारांचे पॅनल व कामाचे वाटप

१.१ ज्या ठिकाणी नकाश्यावर रस्ता उपलब्ध आहे किंवा शेतकऱ्यांची सहमती आहे, अशा ठिकाणी अर्थमुव्हर उत्खनन यंत्राच्या सहाय्याने योग्य आखणी करून दोन्ही बाजुने चर खोदून त्यामधून निघणारी माती/मुरूम शेत/पाणंद रस्त्यामधील भागात टाकण्यात यावी. तसेच चरात खोदून निघालेली माती/मुरूम योग्य प्रमाणात पसरवून रस्त्यांचा कच्चा भराव तयार करण्यात यावा. असा कच्चा रस्ता तयार करण्याकरिता टायर असलेले बॅकहो लोडर व एक्सकॅव्हेटर (७० HP क्षमता असलेले जेसीबी इत्यादी अर्थमुव्हर) याकरिता १२५ तास प्रति किलोमीटर व चेन असलेले एक्सकॅव्हेटर (२०० HP क्षमता असलेले पोकलेन इत्यादी अर्थमुव्हर) करिता ५० तास प्रति किलोमीटर अनुज्ञेय राहील. यापेक्षा प्रति किलोमीटर अधिक तास लागत असल्यास विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीची मान्यता आवश्यक राहील.

१.२ जिल्हास्तरीय समिती ज्या शासकीय नोंदणीकृत कंत्राटदाराकडे टायर असलेले बॅकहो लोडर व एक्सकॅव्हेटर (७० HP क्षमता असलेले जेसीबी इत्यादी अर्थमुव्हर) किंवा चेन असलेले एक्सकॅव्हेटर (२०० HP क्षमता असलेले पोकलेन इत्यादी अर्थमुव्हर), वाहतुकीसाठी ट्रॅक्टर किंवा ट्रक, मुरूम दबाईसाठी साधा स्टॅटिक रोलर आणि व्हायब्रेटिंग रोलर व पाण्याने दबाईसाठी टँकर असेल अशाच कंत्राटदाराकडून विधानसभाक्षेत्र निहाय यंत्रसामुग्रीचे प्रति तास दर, ड्रायव्हर, अटेंडंट व माती व मुरूम याची वाहतूक, पसरविण्यासाठी व दबाईसाठी लागणारे मनुष्यबळ, इंधन, जीएसटी, निकामी (विनावापर) शुल्क, यंत्रसामुग्री शेत/पाणंद रस्त्यावर पोहचविण्यासाठी लागणाऱ्या खर्चासह इतर सर्व खर्च, शुल्क/कर यांसह प्रति तास दर निश्चित करेल.

१.३ वरील सर्व यंत्रसामुग्री असल्याबाबतचा पुरावा कंत्राटदाराने सादर करणे बंधनकारक राहील. सदर शेत/ पाणंद रस्त्यासाठी रस्त्याच्या नमुना अंदाजपत्रकानुसार लागणारी माती व मुरूम व त्याचा वाहतुकीचा व त्यांना पसरविण्याचा खर्चदेखील यात समाविष्ट करावयाचा आहे. त्यामुळे नमुना अंदाजपत्रकानुसार रस्ता करण्यासाठी साधारणतः नियोजित कामात किती माती व मुरूम लागेल याबाबत विधानसभाक्षेत्र निहाय आवश्यक माती व मुरूमाची उपलब्धता व वाहतुकीचा खर्च विचारात घेऊन ते ग्राह्य धरून कंत्राटदाराने खोदकाम करणाऱ्या यंत्रसामुग्रीचे

प्रति तास दर नमुद करावयाचे आहे. जेथुन माती व मुरूम खोदकाम करावयाचे आहे त्याठिकाणी लागणारे वाहतुकीच्या खर्चासह तासदेखील यात ग्राह्य धरावयाचे आहे.

१.३ (अ) पाणंद रस्त्याकरीता आवश्यक असणा-या यंत्रसामुग्रीची यादी ही या शासन निर्णयाच्या परिशिष्ट क्र.२ मधील प्रमाणपत्र क्र.३ मध्ये नमूद केलेली आहे. सदर नमूद यंत्रसामुग्रीपैकी किमान ५०% यंत्रसामुग्री ही कंत्राटदाराच्या स्वमालकीची (Self-Owned) असणे बंधनकारक आहे. उर्वरित ५०% यंत्रसामुग्री कंत्राटदाराने भाडेपट्टयाने (Lease) किंवा संयुक्त उपक्रमाद्वारे (Joint Venture) उपलब्ध करून घेतली तरी ती ग्राह्य धरावी.

१.४ पाण्याचा निचरा होण्यासाठी लागणारे वेगवेगळ्या आकाराचे पाईप पुरवठादाराने उपलब्ध करून पोहचवून दिल्यास ते बसवून देण्याची जबाबदारीदेखील कंत्राटदाराची राहील. कंत्राटदाराला माती व मुरूम वाहतुकीचा खर्च स्वतः करावयाचा आहे. तो खर्च ग्राह्य धरून नमुना अंदाजपत्रकाप्रमाणे रस्ता करून देण्यासाठी साधारणतः जी काही वाहतूक करावी लागेल याबाबतचा खर्च कंत्राटदाराला ग्राह्य धरावयाचा आहे.

१.५ जिल्हा समितीने दबाई करण्यासाठी साधा स्टॅटिक रोलर व व्हायब्रेटर रोलरचे विधानसभाक्षेत्र निहाय प्रति तास दर निश्चित करावे. दबाई करण्यासाठी टँकरने पाणी आणुन टाकणे ही जबाबदारीदेखील कंत्राटदाराची राहील. टँकरने पाणी आणण्याकरिता पाण्याचा खर्च, वाहतुकीचा खर्च, इंधन खर्च, ड्रायव्हरचा खर्च, इतर मनुष्यबळाचा खर्च, शेत/पाणंद रस्त्यापर्यंत रोलर ने-आण करण्याचा खर्च, यंत्रसामुग्री निकामी उभी राहिल्यास त्यासाठी लागणारा खर्च यासह इतर सर्व प्रकारचे खर्च व शुल्क/कर हे सर्व खर्च ग्राह्य धरून कंत्राटदाराने आपले दर नमुद करावयाचे आहे.

१.६ कंत्राटदाराला प्रति तास खोदकाम व वाहतूक करणारे यंत्रसामुग्रीचे व दबाई करण्यासाठी लागणाऱ्या रोलरचे प्रत्यक्ष कामाच्या तासाप्रमाणे देयके अदा करावी. ही बाब स्पष्टपणे दर घेताना नमूद करावी व तसे हमीपत्रदेखील कंत्राटदाराकडून घ्यावे.

१.७ रस्त्याचे यंत्रसामुग्रीचे दर निश्चित करण्यासाठी निविदेचे प्रारूप परिशिष्ट-२ प्रमाणे सोबत जोडले आहे. एकच कंत्राटदार ज्यांच्याकडे सर्व यंत्रसामुग्री आहेत अशाच कंत्राटदाराकडून दर घेण्यात यावेत. साधारणतः जे कंत्राटदार विधानसभाक्षेत्र निहाय निश्चित होतील त्याच कंत्राटदाराला भौगोलीकदृष्ट्या जवळ असलेली एकुण २५ कि.मी. लांबीची कामे पहिल्या टप्यात देण्यात येईल असे नमुद करावे. तसेच माती/मुरूम खोदकामाचे, वाहतुकीचे, पसरविण्याचे व रोलरने दबाई करण्याचे काम एकाच कंत्राटदाराला देण्यात यावे व एकत्रित दर ग्राह्य धरून प्रति किलोमीटर कोणाचा दर कमी येईल याबाबत एकत्रित विचार करून न्युनतम दर निश्चित करावे. साधारणतः एका विधानसभा क्षेत्रात जास्त लांबीची कामे दिल्यास

सलग काम उपलब्ध होईल व यंत्रसामुग्रीला काम मिळेल. वेगवेगळ्या ठिकाणी वाहतुकीचा खर्च लागणार नाही हा विचार करून कमी खर्चात काम होईल व शासनाचा निधी वाचेल, कंत्राटदारालाही परवडेल व शेतकऱ्यांना कमी वेळात जास्त लांबीची कामे करून मोठा दिलासा मिळेल.

१.८ जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेली तांत्रिक अर्हता (Technical Qualification) व अंतिम केलेला प्रति तास दर (L१ rate) आधारभूत मानून सदर तांत्रिक अर्हतेस पात्र ठरणा-या इतर कंत्राटदारांची यादी विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीने तयार करावी व जिल्हास्तरीय समितीने अंतिम केलेल्या प्रति तास दरामध्ये (L१ rate) काम करणा-या जास्तीत जास्त कंत्राटदारांचे पॅनेल विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीने तयार करावे.

विधानसभा क्षेत्रस्तरावर पात्र ठरलेल्या कंत्राटदारांच्या पॅनेलमधून कामाचे वाटप करताना त्याच विधानसभा क्षेत्रातील पात्र स्थानिक कंत्राटदारांना प्राधान्य देणेत यावे. स्थानिक कंत्राटदार इच्छुक नसतील तर इतर विधानसभा क्षेत्रस्तरीय कंत्राटदारांना प्राधान्य द्यावे.

कंत्राटदाराला देण्यात आलेल्या कामाच्या रकमेच्या २% इतकी रक्कम सुरक्षा ठेव म्हणून घेण्यात यावी. या व्यतिरिक्त अतिरिक्त सुरक्षा रक्कम घेण्यात येऊ नये. दोष दायित्व कालावधी (Defect Liability Period) संपल्यानंतर सुरक्षा ठेव रक्कम परत करण्यात यावी.

जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेली तांत्रिक अर्हता आणि अंतिम केलेला प्रती तास दर आधारभूत म्हणून विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीने कंत्राटदारांचे जास्तीत जास्त पॅनल तयार करताना नेमकी कोणती प्रशासकीय व कायदेशीर कार्यपद्धती (उदा. जाहिरात प्रसिद्धी, अर्जाचा नमुना, छाननी प्रक्रिया इत्यादी) राबवावी याबाबत क्षेत्रीय स्तरावर स्पष्टता व्हावी याकरिता वापरावयाचा जाहीर सूचनेचा नमुना तयार करण्यात आला असून तो सोबत परिशिष्ट-३ येथे जोडला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

१.९ उपरोक्त शेत/पाणंद रस्त्यावर पाण्याचा विसर्ग होण्यासाठी जिल्हास्तरीय समितीने ४५०, ६००, ८००, ९०० व १२०० मि.मी. अश्या वेगवेगळ्या व्यासाचे NP३ पाईप पुरवठ्याचे विधानसभाक्षेत्र निहाय दर पुरवठाधारकाकडून निश्चित करावे. त्यात कार्यान्वित यंत्रणेनी मागणी केलेल्या रस्त्यापर्यंत पाईप पोहचवून देण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील व आवश्यक रुंदीनुसार बसविण्याची जबाबदारी शेत/पाणंद रस्ता करणाऱ्या कंत्राटदाराची राहील. प्रत्यक्षात ज्या व्यासाचे जे पाईप रस्त्याच्या क्रॉसिंगला किंवा बाजुच्या नालीतून शेतकऱ्याला जाण्या-येण्यासाठी किंवा वाहन नेण्यासाठी आवश्यक असेल त्याप्रमाणे मोजमाप करून पाईपची देयके अदा करावीत.

१.१० साधारणतः अशा पध्दतीने ग्रामीण रस्ते करण्याकरिता सर्व यंत्रसामुग्रीने परिपूर्ण कंत्राटदार हे प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेमध्ये काम करतात. त्याकरिता यंत्रसामुग्रीचे दर ठरविण्यासाठी निविदा प्रक्रिया ही कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना यांनीच करावी व विधानसभा क्षेत्रनिहाय ठरविलेले दराला जिल्हास्तरीय समितीची मान्यता घ्यावी व कंत्राटदार, पाईप पुरवठादाराचे पॅनल तयार करावे.

१.११ साधारणतः उत्खनन करणाऱ्या यंत्रसामुग्रीला प्रति कि.मी. किती घनफुट माती व मुरूमाची आवश्यकता आहे व त्यासाठी यंत्रसामुग्रीला या घनफुट माती व मुरूमासाठी किती तास लागणे अपेक्षित आहे याबाबत मापदंड निश्चित आहे. त्याकरिता देयके देताना झालेले काम व त्यासाठी ज्या तासाप्रमाणे यंत्रसामुग्रीला तासाची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे, त्या मर्यादेत प्रति कि.मी. घनक्षमतेचे माती/मुरूमाचे प्रमाणानुसार तासाची सांगड घालावी व त्यानुसार तासाच्या मर्यादेत देयके द्यावी. मात्र त्यात वाहतुकीचा खर्च समाविष्ट असून वेगळ्याने देण्यात येणार नाही.

भाग २ : रस्ते बांधकामाचे तांत्रिक मापदंड

२.१ शेत/पाणंद कच्चा रस्ता मजबुतीकरण करताना दोन्ही बाजुने चर खोदुन त्यामधून निघणारी माती/मुरूम ही शेत/पाणंद रस्त्यामधील भागात टाकण्यात येऊन त्यावर व्यवस्थित रोलरने दबाई करावी. रस्त्याचा भाग हा काळ्या मातीतुन जात असल्यास भरावावर किमान ३०० मि.मी. जाडीचा कठीण मुरूम टाकण्यात यावा व त्यावर व्हायब्रेटर रोलरनेच व्यवस्थितरित्या पाणी शिंपडुन दबाई करावी. स्थानिक भौगोलिक स्थितीचा विचार करता मुरूमीकरण करून पक्का रस्ता वापराकरीता तयार करण्यात यावा.

२.२ या कामासाठी निर्धारित केलेले शेत/पाणंद रस्त्याचे मातीकाम रस्त्याच्या समांतर गटारे खोदुन खोदकामातील सामुग्री ६० से.मी. जाडीच्या थरामध्ये नेऊन पसरवून टँकरद्वारे पाणी टाकुन दबाई करणे अशा स्वरूपाचे आहे व त्यावर किमान ५.५० मीटर रूंद (उपलब्धतेनुसार) व दबाईनंतर ३० से.मी. जाडीचे मुरूम वाहतुक करून पसरविणे व टँकरने पाणी टाकुन दबाई करण्याचे आहे व पुर्वी मातीकाम कुठल्याही योजनेतुन झाले असल्यास त्यावर आवश्यकतेनुसार मातीकाम करून परत मुरूमाची वाहतुक करून किमान ५.५० मीटर रूंद (उपलब्धतेनुसार) व ३० सें.मी. जाडी पर्यंत पसरविण्याचे आहे.

२.३ सर्वसाधारणपणे १.०० कि.मी. रस्ता भरावयाचे परिमाण खालीलप्रमाणे राहील.

a) Top width : ५.५० मी.

b) Bottom width : ९.१० मी.

परिच्छेद २.२ व २.३ मधील रस्त्यांच्या रुंदीबाबत नमूद परिमाणे ही सर्वसाधारण परिमाणे असून ती प्रत्येक रस्त्यासाठी अनिवार्य समजू नयेत.

२.४ माती व मुरूम याची थराथरामध्ये दबाई केल्यानंतरची मातीची जाडी ६० से.मी. व मुरूमाची जाडी ३० से.मी. असेल.

२.५ खोदकाम केलेल्या नालीचे उतार नैसर्गिक नाल्याकडे राहील व आकारमान खालीलप्रमाणे असेल.

a) Top width : १.०० मी.

b) Bottom width : ०.६० मी.

c) नालीची खोली : ०.६० मी.

२.६ CD (Cross Drainage) Work- नळकांडी पुल बांधताना सिमेंट पाईपचा वापर करावा तथापि सिमेंट पाईप टाकल्यानंतर दोन्ही बाजुने किमान M-१० कॉंक्रिटच्या भिंती (Head Wall) असाव्यात त्यामुळे रस्त्याचा भराव खचणार नाही व CD Work चे आयुष्य वाढेल. शक्यतो पाणंद रस्त्यासाठी मुरूमी रस्तेच पुरेसे आहेत. खडीचे रस्ते बांधकाम केल्यास पुढील २-३ वर्षात त्यावर डांबरीकरण करणे आवश्यक असते. अन्यथा वाहतुकीमुळे खडी रस्त्यावर पसरून रस्ता वाहतुकीस योग्य राहणार नाही. माती मुरूमाचा भराव करताना रस्त्याच्या मध्यापासून दोन्ही बाजुने उतार (Camber) देणे आवश्यक आहे. त्यामुळे रस्त्यावर पावसाचे पाणी साचणार नाही.

२.६ (अ) M-१० कॉंक्रिटच्या भिंती (Head Wall) ची आवश्यकता असल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमावलीनुसार जिल्हास्तरावरील समितीने दरपत्रक निश्चित करावेत. तथापि, पाईप टाकल्यानंतर M-१० कॉंक्रिटच्या भिंतीचे काम करण्यापुर्वी स्टोन पिचिंग करुन काम भागत असेल तर त्याची प्रथम पडताळणी करावी व आवश्यकता असल्यासच M-१० कॉंक्रिटच्या भिंतीचे काम करावे.

भाग ३ : खडीकरण

३.१ मुरूमावर खडीकरण आवश्यक वाटल्यास ३.७५ मीटर रुंदीसाठी वापरण्यात येणाऱ्या खडीची एकूण जाडी २२५ मि.मी. असावी. त्यातील खालच्या थराच्या खडीची जाडी १५० मि.मी. व रुंदी ४.०५ मीटर असावी, Grading I (७५ mm to ४.७५ mm) असावी व वरील थराच्या खडीची जाडी ७५ मि.मी. व रुंदी ३.७५ मीटर, खडीचा आकार Grading II (५३ mm to ४.७५ mm) असावी व त्या खडीचा आकार ग्रामीण रस्ते संहिता (Rural Road Manual) नुसार असावा. सदर खडी ही जवळपासच्या खदानीतुन उपलब्ध होणारी असावी. खडी ही योग्य आकारमानाची फोडुन घ्यावी व त्यानंतरच वापरावी.

३.२ प्रत्येक Layer मधील खडी पसरविल्यानंतर योग्य प्रकारे कोरडी व त्यानंतर पाणी टाकुन रोलरने दबाई करावी. वेगवेगळ्या कामातून उपलब्ध होणाऱ्या दगड/माती/मुरूम यांचा कल्पकतेने वापर करताना दगड हा काळा व वजनदार असावा तो दगड योग्य आकारमानाचा घ्यावा. बाजुपटटयाला (Side Berm) भरावेत, वापरण्यात येत असलेला मुरूम कठीण असावा व खडीकरणाच्या पकडीसाठी वापरण्यात येणारा मुरूम/स्टोन ग्रिड/स्टोन डस्ट असावा. खडीकरणाचे नमुना अंदाजपत्रक तयार करून मुरूम कामाच्या धर्तीवर खडीकरणाचेही नमुना अंदाजपत्रक तयार करून किमान २५ कि.मी. ची कामे एकत्रित करून करण्याची मुभा क्षेत्रीय कार्यान्वयण यंत्रणेला असेल.

३.३ जिल्हा स्तरीय समितीने विधानसभा क्षेत्रनिहाय प्रती कि.मी. खडीकरणाचा दर निविदेद्वारे निश्चित करावा व सदर खर्च हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुचीच्या अंदाजपत्रकापेक्षा प्रति किलोमीटर खडीकरणाचा खर्च किमान २५ टक्केनी कमी आहे याबाबतची खात्री करून उपरोक्त शेत/पाणंद रस्त्याची कामे हाती घेण्यात यावीत. तथापि निधी उपलब्ध न झाल्यास वेगवेगळ्या योजनेतून प्रचलित योजनेनुसार काम करण्याची मुभा क्षेत्रीय कार्यान्वित यंत्रणेला असेल.

****

परिशिष्ट क्र.२.

शासन निर्णय क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र.०२/पाणंद रस्ते, दिनांक १८ नोव्हेंबर, २०२६ .

यंत्रसामुग्रीचे (यंत्रसामुग्री + इंधन + मनुष्यबळ) प्रती तासिका दर निविदाव्दारे दरपत्रक मागविण्याकरीता निविदा प्रारुप

कार्यकारी अभियंता

प्रधानमंत्री/मुख्यमंत्री ग्राम सडक योजना

महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था

जिल्हा ----------

मुख्यमंत्री - बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना

सन. . . . . .

जिल्हास्तरीय यंत्रसमुग्रीचे (यंत्रसामुग्री इंधन + मनुष्यबळ) प्रती तासिका दर निविदाव्दारे दरपत्रक मागविण्याकरीता निविदा प्रारुप

Standard Bid Document सन. . . . . .

कार्यकारी अभियंता (प्रधानमंत्री/मुख्यमंत्री ग्राम सडक योजना)

महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था,

(पत्ता) ----------

निवीदा क्र - ..... सन -----

मा.कार्याध्यक्ष मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना तथा जिल्हाधिकारी यांनी निर्देश दिल्यानुसार..... जिल्हयाकरीता मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना सन------- साठी लागणा-या यंत्र सामुग्री पुरवठा दर निश्चित करणेस्तव खालीलप्रमाणे कंत्राटदाराकडून विधानसभाक्षेत्र निहाय दरपत्रक मागविण्यात येत आहे.

अ. क्र.	विधानसभा क्षेत्राचे नाव	यंत्रसामुग्रीचे प्रकार			
		माती व मुरूम खोदकाम करून ते निर्देशीत शेत/पाणंद रस्त्यापर्यंत आवश्यक जाडी व रूंदीसाठी नेवून आवश्यकतेनुसार वाहतुकीचा व पसरविण्यासाठी लागणारा खर्च गृहीत धरून टायर असलेले बॅकहो लोडर किंवा एक्सकॅव्हेटर (७० एचपी क्षमता असलेले जेसीबी इत्यादी अर्थमुव्हर) चे मनुष्यबळाच्या खर्चासह (कंत्राटदारास मान्य दर रुपये प्रतितास) (रूपये)	माती व मुरूम खोदकाम करून ते निर्देशीत शेत/पाणंद रस्त्यापर्यंत आवश्यक जाडी व रूंदीसाठी नेवून आवश्यकतेनुसार वाहतुकीचा व पसरविण्यासाठी लागणारा खर्च गृहीत धरून चेन असलेले एक्सकॅव्हेटर (२००) एचपी क्षमता असलेले पोकलेन इत्यादी अर्थमुव्हर) चे मनुष्यबळाच्या खर्चासह (कंत्राटदारास मान्य दर रुपये प्रतितास) (रूपये)	शेत/पाणंद रस्त्यावर पसरविलेले माती व मुरूम रस्त्यावर पसरविल्यानंतर टँकरद्वारे पाणी टाकुन आवश्यकतेनुसार रोलरने दबाई करण्यासाठी टँकरचा खर्च ग्राह्य धरुन ८ ते १० टन स्टॅटीक व व्हायब्रेरटरी रोलरचे लागणाऱ्या मनुष्यबळाच्या खर्चासह (कंत्राटदारास मान्य दर रुपये प्रतितास) (रूपये)	
				८ ते १० टन स्टॅटीक रोलर	व्हायब्रेरटरी रोलरचे

<u>अटी व शर्ती -</u>

१) नोंदणीकृत शासकीय कंत्राटधारक यांनी दरपत्रक संबंधीत विभागाच्या कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयातून आवश्यक फी अदा करुन प्राप्त करणे आवश्यक आहे.

२) कोरे दरपत्रक प्राप्त करण्याचा कालावधी दि..... ला सकाळी ११.०० वाजता पासून दि.....ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत राहील.

३) तांत्रिक व आर्थिक देकार / लिफापा उघडण्याचे ठिकाण व वेळ कार्यकारी अभियंता, प्रमंग्रासयो/मुमंग्रासयो .....यांचे कार्यालयात दि..... ना सकाळी ११.०० वाजता (किंवा सक्षम प्राधिकारी ठरवेल त्या दिवशी उघडण्यात येईल.)

४) दरपत्रकांची किंमत रु.१०,०००/- डी.डी. (डी. डी. संबंधीत कार्यकारी अभियंत्यांच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेत असावा) च्या स्वरुपात अर्जासोबत सादर करावा. तसेच डी. डी. ची छायांकीत प्रत तांत्रिक लिफापा मध्ये सादर करावी.

५) सदरहू दरपत्रकांच्या संदर्भात काही तांत्रिक अडचणी असल्यास कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री/मुख्यमंत्री ग्रामीण सडक योजना विभाग ,.....यांचे कार्यालयीन दुरध्वनी क्र..... वर संपर्क साधावा.

६) Instruction to Bidder मधील सुचनेनुसार कंत्राटदारास लिफाफा क्र. २ मध्ये आर्थिक देकार अशाप्रकारे दरपत्रक सादर करावयाचे आहे.

(-Sd-)

कार्यकारी अभियंता

प्रधानमंत्री/मुख्यमंत्री ग्रामीण सडक योजना,

महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था

.....

Instruction To Bidders

लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाचे दस्ताऐवज

१) महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असल्याबाबतचा पुरावा

२) मागील ३ वर्षाचे आयकर भरल्याचा दाखला

३) मागील ३ वर्षाचे जी.एस.टी. भरल्याचा दाखला

४) पॅन कार्ड व जी. एस.टी. नोंदणीची प्रत.

५) पुरविण्यात येणा-या यंत्रसामग्रीचे वय १५ वर्षापेक्षा जास्त नसल्याबाबतचा पुरावा.

६) उपरोक्त यंत्रसामग्री हाताळण्याच्या मुनष्यबळाचे सक्षम अधिकारी यांनी दिलेले परवाना तसेच पोलीस यंत्रणेकडून दिलेले चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र

७) कार्यकारी अभियंता, प्र.मं.ग्रा.स.यो./मु.मं.ग्रा.स.यो कडून कामाचे स्वरूप समजून घेतल्याबाबत विहीत नमुन्यातील हमीपत्रक.

८) सदर कामाकरीता इसारा रक्कम म्हणून कार्यकारी अभियंता, प्र.मं.ग्रा.स.यो./मु.मं.ग्रा.स.यो., यांचे नांवे Pledge केलेले कामाच्या रकमेच्या २ % किमतीचे FDR.

९) उपरोक्त दस्ताऐवजची छाननी केल्यानंतर पात्र असलेल्या कंत्राटदाराचे लिफाफा क्र.२ (आर्थिक देकार) उघडण्यात येईल. पात्र असलेल्या कंत्राटदारांनी सादर केलेल्या निम्नतम देकार असणा-या कंत्राटदाराचे पॅनलमध्ये नाव समाविष्ट करण्यास्तव जिल्हा समितीकडे शिफारस करण्यात येईल. कंत्राटदारांनी काम करण्यासाठी इच्छुक असलेल्या विधानसभाक्षेत्राचा प्राधान्यक्रम स्वतंत्रपणे यासोबत संलग्न करावा.

अटी व शर्ती

१) पात्र असलेल्या निम्नतम शासकीय नोंदणीकृत कंत्राटधारकाचे नाव पॅनलमध्ये निश्चीत झाल्यानंतर मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेअंतर्गत विधानसभा क्षेत्रनिहाय मंजुर असलेल्या कामांपैकी जिल्हास्तरीय समिती ठरवेल त्याप्रमाणे संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणा यांचे देखरेखीखाली कंत्राटदारास यंत्रसामग्रीद्वारे काम करावे लागेल.

२)नोंदणीकृत शासकीय कंत्राटदार यांनी यंत्राचे प्रतीतास दर सादर करताना या यंत्राचा खोदकाम करण्यासाठी व खोदकामामधील सामग्री माती व मुरूम निर्देशीत आकारमानामध्ये शेत/पाणंद रस्त्यापर्यंत नेवून, पसरवून वाहतुकीच्या व मनुष्यबळाच्या खर्चासह साधा स्टॅटिक रोलर व वायब्रेटर रोलरने पाण्याचे टँकर द्वारे पाणी टाकुन रोलींग करणे, या कामासाठी यंत्राला लागणारे इंधन, वंगण, मनुष्यबळ, GST व इतर प्रचलीत शासनाचे कर व इतर खर्च या सर्व बाबींचा विचार करुन दर सादर करावेत.

३) संबंधीत विधानसभाक्षेत्रातील कार्यान्वयीन यंत्रणेद्वारे निर्देशीत कार्यस्थळी यंत्राची ने-आण करण्यासाठी वेगळा खर्च अनुज्ञेय राहणार नाही.

४) खोदकामातुन निघालेल्या सामग्रीला शेत/पाणंद रस्त्यापर्यंत नेण्यासाठी वेगळे वहन दर अनुज्ञेय राहणार नाही व पसरविण्यासाठी मजूर व इतर खर्च देय असणार नाही. कंत्राटदाराने त्याच्याकडील टिप्पर/ट्रॅक्टर द्वारे वाहतुक करणे आवश्यक राहील. सदर वाहतुकीचा खर्च रोड रोलर च्या तासीकादरामध्ये अंतर्भुत असल्याचे समजण्यात येईल. रोलरने दबाई करण्यासाठी पाणी व टँकर वाहतुकीचा वेगळा खर्च अनुज्ञेय राहणार नाही, नोंदणीकृत शासकीय कंत्राटदार त्याच्याकडील टँकरने पाणी टाकुन दबाई करणे अभिप्रेत आहे. रोलरच्या दरामध्ये टँकरचा खर्च अंतर्भूत असल्याचे समजण्यात येईल.

५) तसेच खोदकामातुन निघालेल्या मातीचे वाहतुक करून पसरविणे जाडी ६० से.मी. (दबाईसह) व त्यावर मुरूमाचे वाहतुक खर्चासह पसरविणे विहीत आकारमानात मुरूमाच्या ५.५० मीटर रूंद व ३० से.मी. जाडीच्या थरात (दबाईसह) पसरविण्याचे मनुष्यबळाच्या खर्चासह दर अर्थमुव्हर च्या तासीका दरामध्ये अंतर्भुत असल्याचे समजण्यात येईल.

६) खोदकाम यंत्राला तासीका गणना मिटर (Hour Meter) असणे बंधनकारक राहील.

७) विनावापर उभ्या असलेल्या यंत्रसामग्रीसाठी कोणतेही भाडे देय राहणार नाही. कुठल्याही शेतक-यांनी रस्त्याच्या हद्दीबाबत हरकत घेवून काम थांबविल्यास यंत्रसामग्री विना वापर उभी राहिल्यास कुठलाही अतिरीक्त खर्च मिळणार नाही.

८) कंत्राटदाराकडे एक्सावेटर, बॅकहो लोडर, दबाईसाठी वायब्रेटर रोलर व टँकर, वाहतुकसाठी ट्रक/टिप्पर असणे आवश्यक आहे. वरील सर्व यंत्रसामुग्री असल्याबाबतचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.

९) लिफाफा क्र.१ मध्ये नोंदणीकृत शासकीय कंत्राटदाराने सादर केलेले दस्ताऐवज अयोग्य/चुकीचे आढळल्यास अशा कंत्राटदाराचा लिफाफा क्र.२ उघडण्यात येणार नाही.

१०) शिफारस करण्यात आलेल्या कंत्राटदाराचे पॅनलमध्ये नाव समाविष्ठ करण्याचे अधिकार जिल्हास्तरीय समितीकडे राहील.

११) यंत्रसामग्रीचे पुरवठा करण्याचे दर आकडे व अक्षरी या दोन्ही स्वरुपात नमुद करण्यात यावे. आकडे व अक्षर टाकण्यात आलेल्या दरामध्ये तफावत आढल्यास अक्षरी टाकण्यात आलेले दर ग्राहय धरण्यात येईल.

१२) सदर यंत्रसामुग्री दराची ग्राहयता दोन वर्षाची राहील. दोन्ही पक्षानी सहमती दिल्यास ग्राहयता कालावधी आवश्यकतेनुसार वाढविण्यात येईल.

१३) सदर दरपत्रकाच्या संदर्भात कोणाताही वाद निर्माण झाल्यास याबाबतचा निर्णय जिल्हास्तरीय समिती कडे संदर्भित केला जाईल व समितीने घेतलेला निर्णय कंत्राटदारास बंधनकारक राहील, न्यायालयीन बाबी उद्भवल्यास न्यायाधिकार क्षेत्र मा. उच्च न्यायालय हे राहील.

१४) कामावर नेमलेल्या मजुराचे सोयी सवलती, शासकीय नियमानुसार अपघात क्षतीपुर्ती साठी स्वतः नोंदणीकृत शासकीय कंत्राटदार जाबाबदार राहील. तसेच सदर कामावर बाल कामगाराची नियुक्ती करता येणार नाही व महिला कामगार यांना संध्याकाळी ५.३० नंतर कामावर ठेवता येणार नाही.

१५) कंत्राटदाराने कामावर असलेल्या मजुरांचे साथीचे रोग साठी दक्षता घेणे तसेच या रोगाचा फैलाव होणार नाही याबाबत देक्षता घेणे ही जबाबदारी राहील.

१६) जिल्हानिहाय अंतिम केलेले पॅनल व उपलब्ध कामानुसार कार्यान्वयीन यंत्रणा व पॅनलमधील कंत्राटदार यांच्यामध्ये वाटप केलेल्या कामासाठी वेगळा करारनामा सुरक्षा रक्कम भरल्यानंतर विधानसभा क्षेत्रस्तरावर करण्यात येईल. सदरील करारनामा हा कामाच्या तांत्रिक प्रशासकीय व वित्तीय अटी व शर्ती बाबत असेल. करारनाम्यामध्ये विहीत केलेल्या कालावधीमध्ये निर्देशीत काम पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदार यांची राहील.

१७) केलेल्या कामासाठी यंत्राचे प्रत्यक्ष झालेले तास याची गणना करुन करारनाम्याच्या अटी व शर्तीनुसार देयक अदा करण्यात येईल.

१८) या कामासाठी निर्धारीत केलेले शेत/पाणंदरस्त्याचे मातीकाम रस्त्याच्या समांतर गटारे खोदुन, खोदकामातील सामुग्री ६० से.मी. जाडीच्या (दबाईसह) थरामध्ये नेवून पसरवून, टँकरद्वारे पाणी टाकुन दबाई करणे अशा स्वरुपाचे आहे व त्यावर ५.५० मीटर रूंद व ३० से.मी. जाडीचे (दबाईसह) मुरूम वाहतुक करून पसरविणे व टँकरने पाणी टाकुन दबाई करण्याचे आहे व पुर्वी मातीकाम मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेतुन किंवा अन्य योजनेतुन झाले असल्यास त्यावर आवश्यकतेनुसार मातीकाम करून परत मुरूमाची वाहतुक करून ५.५० मीटर रूंद व ३० से.मी. जाडी (दबाईसह) पर्यंत पसरविण्याचे आहे. किंवा कार्यान्वयीन यंत्रणा यांनी निर्धारित केलेल्या अंदाजपत्रकानुसार व त्यांनी नमुद केलेल्या मानकानुसार मातीकाम करणे अभिप्रेत आहे.

१९) रस्त्यालगत पुरेशी खोदकाम सामुग्री माती व मुरूम उपलब्ध न झाल्यास लगतच्या शेतीमधून संबंधित शेतक-याच्या पूर्वपरवानगीने किंवा उपलब्ध शासकीय जमीनीधून माती व मुरुम आणता येईल. मात्र यासाठी वेगळे वाहतूक भाडे अनुज्ञेय राहणार नाही. प्रत्येक विधानसभाक्षेत्रात मुरूमाची उपलब्धता सरासरी किती अंतरावर आहे याबाबत शहनिशा करूनच व वाहतुकीसाठी येणारा खर्च विचारात घेवूनच कंत्राटदार यांनी दर नमूद करावे.

२०) पॅनलमध्ये सामाविष्ठ असलेल्या कंत्राटदारास यांना एक यंत्रसामुग्री संच साठी एक क्लस्टर असे काम वाटप करण्यात येईल.

२१) कंत्राटदाराने कामाच्या ठिकाणी कामाच्या माहितीविषयक फलक लावणे आवश्यक राहील. फलकावरील मजकूर कार्यान्वयीन यंत्रणा नमूद करेल त्यानुसार राहील. त्यासाठी वेगळा खर्च मिळणार नाही.

२२) RCC Hume Pipe (NP ३) ठरवून दिलेल्या ठिकाणी मशीनद्वारे आवश्यक खोदकाम करुन बसवून देणे व CC M१० मध्ये हेडवॉल करण्याची जबाबदारी कंत्राटदार यांची असेल.

२३) रस्त्याचे कामासाठी टायर असलेले बॅकहो एक्सावेटर- लोडर ७० HP क्षमता असलेले J.C.B. व अर्थ मुव्हर साठी १.०० कि.मी. मातीकामासाठी सरासरी १२५ तास किंवा कमी लांबीकरिता प्रत्यक्ष झालेला वापर कि.मी. च्या अनुषंगाने रुपांतरीत करुन त्याप्रमाणे देयके देण्यात येईल.

२४) चेन असलेले एक्सावेटर २०० HP क्षमता असलेले पोकलॅन यासाठी १.०० किमी मातीकामसाठी जास्तीजास्त तास ५० किंवा कमी लांबीकरिता प्रत्यक्ष झालेला वापर कि.मी. च्या अनुषंगाने रुपांतरीत करुन त्याप्रमाणे देयके देण्यात येईल.

२५) काम संपुर्णपणे पूर्ण झाल्याशिवाय अंतीम देयक देय होणार नाही. कामाच्या भागाकरिता १ किमी लांबी पर्यंत कमाल मुदत ३ आठवडे, २ किमी करिता ५ आठवडे व ३ किमी पर्यंत ७ आठवडे असेल. कामात अतिक्रमण उदभविल्यास किंवा इतर काही नैसर्गिक आपदा उद्भवल्यास या अडचणी दुर झाल्यापर्यंतची अधिकची मुदत वाढ देण्यात येईल अथवा इतर अपरिहार्य कारणामधे कार्यान्वयीन यंत्रणेद्वारे मुदतवाढ करारनामा धारकाला मागणी केल्यास कार्यान्वयीन यंत्रणेच्या निर्णयानुसार देता येईल.

२६) मुदतवाढीस, यंत्र व कर्मचाऱ्यांचे निष्काम कालावधीचा खर्च अथवा यंत्र / कर्मचारी हलविण्याचा खर्च अथवा देखभाल अथवा कामात क्षति/नुकसान इत्यादी इतर कुठल्याही प्रकारचा खर्च अथवा प्रतिपुर्ती रक्कम इत्यादी काहीही करारनामा धारकास देय होणार नाही.

२७) तसेच कामात ८ दिवसापेक्षा अधिक एकूण खंड / प्रलंब/विलंब झाल्यास किंवा कामाला पूर्णत्व न केल्यास, अथवा मुरमीकरणाचे काम पूर्ण न केल्यास तसेच काम पूर्ण झाल्यापुर्वीच्या कालावधी /मुदतीच्या आत पूर्ण न केल्यास आणि कामाच्या मुदतवाढीकरिता कारणे संयुक्तीक नसल्यास कंत्राटदारावर दंड आकारण्याचे अधिकार विधानसभाक्षेत्र स्तरीय समितीस राहील.

२८) DLP किमान ६ महिने किंवा १ पूर्ण पावसाळा (यापैकी जे नंतर संपेल ते) राहील.

२९) कार्यान्वयीन यंत्रणेनी आखून दिलेल्या रस्त्याची Alignment नुसार करारनामा धारक काम करतील. जंक्शन वर आवश्यक ते Fanning करतील व आवश्यकतेनुसार पाईप टाकून जागा उपलब्धततेनुसार रस्त्यावर गोलाई (Fanning) करणे बंधनकारक राहील.

३०) सामुग्री खरेदी अथवा दुरुस्ती करीता अग्रीम देय राहणार नाही. जर यंत्रसामुग्री संचामधील एखादे यंत्र नादुरुस्त झाले तर त्याबाबतीत दुसरी यंत्रसामुग्री तात्काळ पुरविण्याची जबाबदारी ही कंत्राटदाराची राहील.

३१) मंजूर तासिका दराव्यतिरीक्त इतर कोणताही मोबदला यंत्रसामुग्री पुरवठयापोटी देय राहणार नाही.

३२) कुठलेही supervision चार्जेस देय होणार नाही तसेच profit म्हणुन काहीही देय होणार नाही.

३३) सर्व सामुग्री माती, मुरुम, खडी इत्यादी पसरविणे यंत्राद्वारे केली जाणार असल्याने हया कामाकरिता अतिरिक्त मजूरी देय राहणार नाही. तसेच पाईप बसविण्याचे काम देखील यंत्राद्वारे केली जाणे अपेक्षित असुन हयाला देखील अतिरिक्त मजुरी देय होणार नाही.

३४) पुरवठा केलेली सामुग्री मुरुम, खडी इत्यादी वस्तु मोजमाप पुस्तिकेतील नोंदी नुसारे अंतीम मान्य केली जाईल. मोजमाप पुस्तीकेत कनिष्ठ अभियंता यांनी देयक तपासणे व प्रमाणित करणे बंधनकारक राहील.

३५) यंत्राचे वापराचे तास प्रमाणपत्रानुसार मोजमाप पुस्तिकेतील नोंदी नुसार अंतीम मान्य केली जाईल.

३६) नाव फलक उभारणे व रंगविणे करिता देयक, अंदाजपत्रकात नमुद दराप्रमाणेच मान्य होईल.

३७) काम पुर्ण झाल्यापुर्वी कामावर आढळलेल्या त्रुटया अथवा कामाला झालेली क्षतीपुर्तीला, करारनामा करणार हे जबाबदार असणार व हया सर्व त्रुट्या व क्षती त्याला दुरुस्त करणे, काम पुर्ण करणे आधी बंधनकारक असणार.

३८) संपुर्ण काम कार्यान्वित होईपर्यंत सदर कामावर Visit Book/Order Book ठेवणे करारनामा धारकाला बंधनकारक असेल व त्यामधील निर्देशाचे पालन आवश्यक असेल. तसेच खडी पुरवठाधारकास अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दर असल्यास करारनामामध्ये नमुद केलेल्या अटीनुसार अतिरीक्त सुरक्षा ठेव रक्कम, करारनामा करतेवेळी संबंधित कार्यान्वयीन समितीकडे जमा करणे अनिवार्य राहील.

३९) रस्त्यालगत उपलब्ध असलेल्या पाण्याच्या स्त्रोतापासून टँकरद्वारे कार्यस्थळी पाणी आणून दबाई करणे अपेक्षीत असून पाण्याच्या वहनासाठी अतिरिक्त मोबदला देय राहणार नाही.

४०) पाणंद रस्त्याचे काम संबंधीत विधानसभाक्षेत्रामध्ये कोणत्याही क्षेत्रामध्ये निर्देशीत करण्यात येईल व हे काम संबंधीत विधानसभाक्षेत्राकरीता मंजूर करण्यात आलेल्या दरामध्येच करणे अनिवार्य राहील. अंतरातील फरकासाठी कोणतेही अतिरीक्त दर देण्यात येणार नाही.

दिनांक:- कंत्राटदाराची स्वाक्षरी,

शिक्का पूर्ण पत्ता व संपर्क क्रमांक

ठिकाण:-

फॉर्म क्रं.१ मध्ये सादर करावयाचे विहीत प्रमाणपत्राचा नमुना

प्रमाणपत्र क्र. १.

मी खालील सही करणारा दरपत्रक धारक मे .....

याव्दारे असे जाहिर करीतो की, मी कोणत्याही शासकीय/निमशासकीय कार्यालयाकडून BLACK LISTED झालेला नसून ई-दरपत्रकाच्या प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर BLACK LISTED असल्याचे किंवा कोणत्याही प्रकारचे न्यायालयीन फौजदारी दावे आपणांस निदर्शनास आल्यास माझ्यावर नियमानुसार होणाऱ्या कार्यवाहीस पात्र राहील.

दिनांक:- **कंत्राटदाराची सही**

ठिकाण:- **नाव व पत्ता**

लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाचे विहीत प्रमाणपत्राचा नमुना

प्रमाणपत्र क्र. २ (हमीपत्र).

मी खालील सही करणार याद्वारे अशी हमी देतो की, या जाहीरातीद्वारे पुरविण्यात आलेल्या अटी व शर्ती तसेच कार्यान्वयीन पध्दती मी संपूर्णपणे वाचलेली असून मी कार्यकारी अभियंता, प्र.ग्रा.स.यो./मु.मं.ग्रा.स.यो. यांच्याकडून कामाचे स्वरूप समजुन घेतले आहे. यामधील अटी व शर्ती पात्र झाल्यानंतर जर माझी निवड विधानसभा क्षेत्रस्तरीय पॅनलमध्ये झाली तर मंजूर दरानुसार संबंधीत तालुक्यामध्ये कार्यान्वयीन यंत्रणा निर्देशीत करतील त्याठिकाणी पाणंद रस्त्याचे मातीकाम व मुरुमीकरण वाहतुक करून व पसरवून दबाई करण्याचे काम कार्यान्वयीन यंत्रणेने विहीत केलेल्या कालावधीमध्ये यंत्रसामुग्रीद्वारे पूर्ण करण्याची माझी जबाबदारी राहील.

दिनांक:- **कंत्राटदाराची सही**

ठिकाण:- **नांव व पत्ता**

मुख्यमंत्री - बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना सन----

अनामत रकमेचा तपशिल (Details of FDR)

अनामत रकमेचा तपशिल (Details of FDR)			
१.	बँकेचे नाव		
२.	शाखा		
३.	FDR क्रमांक		
४.	दिनांक		
५.	अनामत रक्कम रुपये		
६.	विहित नमुन्यात काम करण्याबाबत हमीपत्र		
७.	रुपये ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा		
८.	प्रपत्र मान्य असल्याबाबत कंत्राटदाराने मान्य करुन दिल्याबाबत शपथपत्र		

कंत्राटदाराची स्वाक्षरी व स्टॅम्प

लिफाफा क्रमांक १ मध्ये सादर करावयाचे विहीत प्रमाणपत्राचा नमुना

प्रमाणपत्र क्र.३ (यंत्रसामुग्रीची माहिती).

अ.क्र.	यंत्रसामुग्रीचे नाव	यंत्रसामुग्रीचे आर्युमान	वाहन क्रमांक	उपलब्ध संख्या
१.	बॅकहो लोडर व एक्सकॅव्हेटर (७० एचपी क्षमता असलेले जेसीबी)			
२.	चेन असलेले एक्सकॅव्हेटर (२०० एचपी क्षमता असलेले पोकलेन)			
३	रोड रोलर (Static) ८ ते १० टन			
४.	Vibratory Road Roller			
५.	Water Tanker			
६.	Tippers/Tractor			

RTO कडुन प्रमाणित केलेले वाहनाचे RC Book, Insurance व इतर जोडणे आवश्यक राहील

दिनांक :-

ठिकाण :-

कंत्राटदाराची सही

नाव व पत्ता

लिफाका क्रं. २ मध्ये सादर करण्यात येणा-या दरपत्रकाचा विहीत नमुना

अ.क्र.	विधानसभा क्षेत्राचे नाव	यंत्रसामुग्रीचे प्रकार			
		माती व मुरूम खोदकाम करून ते निर्देशीत शेत/पाणंद रस्त्यापर्यंत आवश्यक जाडी व रूंदीसाठी नेवून आवश्यकतेनुसार वाहतुकीचा व पसरविण्यासाठी लागणारा खर्च गृहीत धरून टायर असलेले बॅकहो लोडर व एक्सकॅव्हेटर (७० एचपी क्षमता असलेले जेसीबी ईत्यादी अर्थमुव्हर चे मनुष्यबळाच्या खर्चासह (दर रुपये प्रतितास)	माती व मुरूम खोदकाम करून ते निर्देशीत शेत/पाणंद रस्त्यापर्यंत आवश्यक जाडी व रूंदीसाठी नेवून आवश्यकतेनुसार वाहतुकीचा व पसरविण्यासाठी लागणारा खर्च गृहीत धरून चेन असलेले एक्सकॅव्हेटर (२०० एचपी क्षमता असलेले पोकलेन इत्यादी अर्थमुव्हर चे मनुष्यबळाच्या खर्चासह (दर रुपये प्रतितास)	शेत/पाणंद रस्त्यावर पसरविलेले माती व मुरूम रस्त्यावर पसरविल्यानंतर टँकरद्वारे पाणी टाकुन आवश्यकतेनुसार रोलरने दबाई करण्यासाठी टँकरचा खर्च ग्राह्य धरून ८ ते १० टन स्टॅटीक व व्हायब्रेरटरी रोलरचे लागणाऱ्या मनुष्यबळाच्या खर्चासह (दर रुपये प्रतितास)	
				८ ते १० टन स्टॅटीक रोलर	व्हायब्रेरटरी रोलर

दिनांक

कंत्राटदाराचे नांव व स्वाक्षरी

लिफाका क्रं. २ मध्ये सादर करण्यात येणा-या IS NP३ Hume Pipe दरपत्रकाचा विहीत नमुना.

अ. क्र.	विधानसभा क्षेत्राचे नाव	IS NP३ Hume Pipe				
		१२०० mm व्यासाचे प्रतिमीटर कार्यस्थळी पुरविण्याचे दर (रुपये)	९०० mm व्यासाचे प्रतिमीटर कार्यस्थळी पुरविण्याचे दर (रुपये)	८०० mm व्यासाचे प्रतिमीटर कार्यस्थळी दर (रुपये)	६०० mm व्यासाचे प्रतिमीटर कार्यस्थळी पुरविण्याचे दर (रुपये)	४५० mm व्यासाचे प्रतिमीटर कार्यस्थळी पुरविण्याचे दर (रुपये)

परिशिष्ट क्र. ३.

शासन निर्णय क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र.०२/पाणंद रस्ते, दिनांक १८ नोव्हेंबर, २०२६ .

जाहीर सुचना

..... जिल्हयाकरीता विधानसभा क्षेत्रातील मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना सन------ करीता दर निश्चित करण्यासाठी विधानसभा क्षेत्र निहाय यंत्रसामुग्रीचे (यंत्रसामुग्री इंधन मनुष्यबळ) प्रति तासिका दर ई-निविदाव्दारे खाजगी यंत्रसामुग्री धारकांकडुन दर मागविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने निविदामध्ये प्राप्त न्युनत्तम दराला जिल्हास्तरीय समितीव्दारे प्राप्त मंजूरी सोबत जोडलेल्या सहपत्र क्र १ मध्ये नमुद केलेले आहे.

जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेली तांत्रिक अर्हता (Technical Qualification) व अंतिम केलेला प्रति तास दर (L१ Rate) (सहपत्र १ प्रमाणे) आधारभुत मानून कंत्राटदार ज्या विधानसभा क्षेत्रामध्ये काम करण्यास इच्छुक असेल त्या विधानसभा क्षेत्राचा प्राधान्यक्रम दर्शवून पात्रताधारक कंत्राटदाराने योग्य व आवश्यक दस्ताऐवजासह निविदा फि रुपये १०,०००/- चा धनाकर्ष (Demand Draft) व कामाच्या रकमेच्या २ % किंमतीचा FDR..... याच्या नावे जमा करुन नामनिर्देशन (Empanelment) करीता आवेदन पत्र दिनांक.....ते दिनांक.....या कालावधीमध्ये मागविण्यात येत आहे.

उप विभागीय अधिकारी . . . . .

शासन निर्णय क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र.०२/पाणंद रस्ते, दिनांक १८ नोव्हेंबर, २०२६ .

सहपत्र -१.

यंत्रसामुग्रीचे जिल्हा स्तरीय समितीव्दारे मंजुर केलेले दर (प्रती तास)

अनु क्र.	मशिनरीचे नाव	जिल्हा कार्यकारी समितीने मंजूर केलेले दर
१	70 HP JCB	
२	200 HP Poclain	
३	Static Roller	
४	Vibratory Roller	

Is NP ३ Hume Pipe चे मंजुर केलेले दर (प्रती Rmt.)

अनु क्र.	Is NP ३ Hume Pipe	जिल्हा कार्यकारी समितीने मंजूर केलेले दर
१	1200 mm	
२	900 mm	
३	800 mm	
४	600 mm	
५	450 mm	

PCC grade M १० Concrete चे मंजुर केलेले दर (प्रती Cum.)

अनु क्र.	M १० Concrete	जिल्हा कार्यकारी समितीने मंजूर केलेले दर
१	Nominal Mix 1:3:6 (Hand Mixing) Concrete/Cum	

शासन निर्णय क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र.०२/पाणंद रस्ते, दिनांक १८ नोव्हेंबर, २०२६ .

सहपत्र - २.

१. महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असल्याबाबतचा पुरावा.

२. मागील ३ वर्षाचे आयकर भरल्याचा दाखला.

३. मागील ३ वर्षाचे जी.एस.टी. भरल्याचा दाखला.

४. पॅनकार्ड व जी.एस.टी. नोंदणीची प्रत.

५. पुरविण्यात येणा-या यंत्रसामग्रीचे वय १५ वर्षापेक्षा जास्त नसल्याचा पुरावा.

६. उपरोक्त यंत्रसामग्री हाताळणा-या मनुष्यबळाचे सक्षम अधिकारी यांनी दिलेले परवाना तसेच पोलीस यंत्रणेकडुन दिलेले चारित्र पडताळणी प्रमाणपत्र.

७. .....यांच्याकडुन कामाचे स्वरुप समजून घेतल्याबाबत विहीत नमुन्यातील हमीपत्रक.

८. सदर कामाकरीता इसारा रक्कम म्हणुन.....यांचे नावे Pledge केलेले कामाच्या रकमेच्या २ % किमतीचे FDR.

९. उपरोक्त शासन निर्णयान्वये शासन स्तरावरुन वेळोवेळी निर्गमित केलेले अटी व शर्ती लागू राहतील.

****